
# सुसंवादाच्या पाऊलखुणा

मुलं घडवणारे आपण कोण?
आपण फुलवूया त्यांना
प्रेमाचं खतपाणी घालून
कीड न लागण्याची
काळजी घेऊन
खंबीरपणे मांडव करून
वाढवूया त्यांना
फुला-फळांची अभिलाषा
नको आपल्याला
आणि
फुलं कोणत्या वासाची
फळं कोणत्या चवीची
हे ठरविणारे आपण कोण ?
ती फुलतील - फळतील
त्यातच कृतार्थ होऊ आपण !





मी ऐकलं !
मी विसरले !



मी पाहिलं !
माझ्या लक्षात राहिलं !



मी केलं !
मला कळलं !



मी स्वतः शोधलं आणि
उपयोगात आणलं !

# अर्पणपत्रिका

ही पुस्तिका ज्यांच्या सहकार्याने व प्रेरणेने तयार झाली त्या ननाशी व देवगांव शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक व इतर कर्मचारी यांना सस्नेह अर्पण.

‘सुसंवादाच्या पाऊलखुणा’ पुस्तिका तयार करण्यामध्ये अभिव्यक्तितील सर्वच कार्यकर्त्यांचा मोठा वाटा आहे. त्याचबरोबर मुलांसोबत काम करणाऱ्या खालील संस्थांच्या कार्यकर्त्यांनीही या पुस्तिकेचे पूर्वपरीक्षण केले आहे. त्यामुळे ही पुस्तिका अधिक समृद्ध करण्यास त्याचा फायदा झाला असं आम्हाला वाटतं. आम्ही या सर्वांचे मन:पूर्वक आभारी आहोत.

| **संस्था** | **प्रतिनिधी** |
|---|---|
| सेव्ह द चिल्ड्रन कॅनडा - पुणे | - अमिता गोडबोले |
| बालभारती, पुणे | - अजयकुमार लोळगे |
| एकात्मिक बालविकास योजना, सिन्नर | - श्रीमती एल. एस. तायडे |
| प्रीती बालवाडी, नाशिक | - सुषमा बोरा |
| युवा, मुंबई | - काश्मिर कांबळे |
| महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक | - रोहिणी धोपावकर, मिनाक्षी डांगळे |
| सुजाण पालक, नाशिक | - उषा सराफ |
| | - वंदना अत्रे |

# सुसंवादाच्या पाऊलखुणा


लेखन - वंदना पटेकर
संपादकीय सहाय्य - अश्विनी जोग, छाया देव
संगणित अक्षर जुळवणी - मधुलिका झांबरे
मुखपृष्ठ कविता - छाया देव (सुजाण पालक तर्फे)
मुखपृष्ठ, रेखाचित्रे - किरण मोहिते
अर्थ सहाय्य - सेव्ह द चिल्ड्रन, कॅनडा
प्रकाशक - अनिता बोरकर



**अभिव्यक्ति**
**मीडिया फॉर डेव्हलपमेंट**
ॐकार बंगला, गीतांजली सोसायटी,
वाघ गुरुजी शाळेसमोर, पंपिंग स्टेशन रोड,
नाशिक - ४२२ ००५. (महाराष्ट्र)
फोन व फॅक्स नं. - (०२५३)५८०९८१



**देणगी मूल्य** - रु.२५/-

**मुद्रण** - जस्ट इमॅजिन, नाशिक.

फक्त खाजगी वितरणासाठी


## अनुक्रम


| सत्र क्र. | सत्राचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| १. | चला शिकूया मुळाक्षरं | ११ |
| २. | गाळ्याची फजिती | १३ |
| ३. | खरेदी करायला शिकू या ! | १५ |
| ४. | खेळातून गणित | १७ |
| ५. | शिकू या पोस्टाचे व्यवहार | २० |
| ६. | घड्याळ शिकविणे | २१ |
| ७. | नकाशा वाचन | २३ |
| ८. | कविता, गोष्टी तयार करु या ! | २५ |
| ९. | खेळातून आकार | २७ |
| १०. | मी कोण होणार ? | ३० |
| ११. | हे कसं ? ते कसं ? हे काय ? ते काय? | ३१ |
| १२. | मैत्री निसर्गाशी | ३३ |
| १३. | भेंड्या खेळूया शब्दांच्या ! | ३५ |
| १४. | सामूहिक वर्तमानपत्र वाचन | ३७ |
| १५. | काळजी खाण्याची | ३९ |
| १६. | झाडांची किमया | ४३ |
| १७. | पावसाळा व इंद्रधनुष्य | ४५ |
| १८. | जाणीव सामाजिक स्वास्थ्याची | ४७ |
| १९. | हे दिवस लक्षात ठेवू या ! | ५१ |
| २०. | सांस्कृतिक मेळावा | ५३ |
| २१. | आरोग्य जत्रा | ५५ |
| २२. | गंमत जत्रा | ५७ |

## अभिव्यक्ति विषयी .......

ह्या पुस्तिकेची प्रत्यक्ष सुरूवात करण्यापूर्वी ज्या संस्थेच्या माध्यमातून आश्रमशाळा प्रकल्प राबवला होता, त्या 'अभिव्यक्ति'ची ओळख करुन घेणे अगत्याचे ठरते. 'अभिव्यक्ति' ही संस्था गेली नऊ वर्षे माध्यमातून विकासाचे ध्येय घेऊन सामाजिक क्षेत्रात काम करत आहे. माध्यमांबद्दल जाण व आस्था असणाऱ्या काही युवकांच्या सहभागातून सुरू झालेल्या 'अभिव्यक्ति'चा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. अभिव्यक्ति मुख्यत: तीन क्षेत्रात काम करत आहे. सर्वात महत्वाचं म्हणजे सामाजिक आशयाची माध्यमे तयार करणे. ही माध्यमे पुढे लोकशिक्षण वा लोकजागृतीसाठी विविध संस्था संघटना वापरतात. ह्या माध्यमांमध्ये बाहुलीनाट्य, पोस्टर्स, फ्लॅनल स्टोरी, स्लाईड शो, व्हिडीओ फिल्मस्, ऑडिओ कॅसेटस्चा समावेश होतो. अनेक सामाजिक विषयांवरील माध्यमांचा एक संग्रह सुद्धा अभिव्यक्तिकडे आहे. ह्या संग्रहाचा विविध व्यक्ति, संस्था, संघटना सातत्याने उपयोग करून घेतात. ह्याशिवाय अशा माध्यमांची जाहीर प्रदर्शने भरवणे, शाळांमधून माध्यमे प्रदर्शित करणे इ. कार्यक्रम सातत्याने सुरू आहेतच. वेगवेगळ्या सामाजिक विषयांवरील माध्यमे तयार करतांनाच अस्तित्वात असलेल्या प्रसार माध्यमांच्या समाज, मूल्य व्यवस्था व राहणीमान यावर होणाऱ्या परिणामांबद्दल लोकजागृती करण्याचे कामही अभिव्यक्ति करत आहे.

प्रशिक्षण हे अभिव्यक्तिच्या कार्याचं एक महत्वाचं अंग. संवाद कौशल्य, गटमाध्यमे, व्यावसायिक परिणामकारकता, पालकत्व, व्यक्तिमत्व विकास अशा अनेकविध विषयांवर कार्यशाळा आयोजित केल्या जातात. ह्या प्रशिक्षण कार्यक्रमातून व्यक्ति, संस्था, संघटना ह्यांचे हात बळकट करणे हे उद्दिष्ट आहे. असे निवासी प्रशिक्षण कार्यक्रम नाशिकमध्ये घेतले जातात. शिवाय असे कार्यक्रम घेण्यासाठी अभिव्यक्तिचा प्रशिक्षक गट बाहेर गावी सुद्धा जातो.

'माध्यमांच्या मदतीने मुलांचे शिक्षण अधिक रंजक करता येते' हा विचार घेऊन 'अभिव्यक्ति' गेली तीन वर्षे (१९९३-९६) आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांसोबत काम करत आहे. अभिव्यक्तिच्या याच प्रयत्नांचे फलित म्हणून ही पुस्तिका सादर करत आहोत.

अभिव्यक्ति परिवार

**भूमिका :**

'सुसंवादातून विकास - विकासासाठी माध्यमे' हे अभिव्यक्तिच्या कामाचं मुख्य सूत्र आहे. समाजातील प्रत्येक घटकाला आपल्या आशा, आकांक्षा, विचार, भावना व्यक्त करण्याची संधी मिळायला हवी तरच समाजातील विविध घटकांमध्ये सुसंवाद घडू शकेल, त्यांच्यातील नाती विकसित होऊ शकतील. ही संधी प्रत्येकाला मिळावी म्हणून समाजातील विविध स्तरांमध्ये 'अभिव्यक्ति' विविध उपक्रम राबवते. आदिवासी आश्रमशाळांमध्ये गेली तीन वर्षे सुरू असलेला उपक्रम या भूमिकेशी सुसंगत असाच आहे.

शहरापासून, तेथील वेगवान जीवनापासून, दूर रहाणाऱ्या आदिवासी समाजाला स्वतःच्या इच्छा, आकांक्षा व्यक्त करण्याची संधी क्वचितच मिळते. स्त्रिया व मुले तर यापासून नेहमीच वंचित रहातात. मन मोकळं करण्याची संधी आणि व्यासपीठ हे दोन्ही नसल्याने या समाजाला इतर समाजाशी नातं जोडणं हेही अवघड होऊन बसतं. त्यामुळे समाजाच्या मुख्य प्रवाहापासून हा वर्ग दूर, काहीसा तुटलेला असाच रहातो. एकीकडे संवादाची अशी संधी नसताना दुसरीकडे समाजाच्या मुख्य प्रवाहात घडणाऱ्या बदलांचे परिणाम या समाजावर नक्कीच होत असतात. विशेषतः सांस्कृतिकीकरणाचे परिणाम अधिक. याचे स्पष्ट प्रतिबिंब शासकीय आश्रमशाळांमध्ये दिसते.

या आश्रमशाळांमध्ये आजूबाजूच्या आदिवासी पाड्यातून, खेड्यातून, लहान-लहान मुलं येतात. अनेकदा शाळेत येणारी या समाजाची ही पहिलीच पिढी असते हे लक्षात घेता या मुलांशी व त्याद्वारे त्यांच्या कुटुंबाशी संवाद साधण्याची एक उत्तम संधी या शाळेच्या निमित्ताने उपलब्ध आहे. या मुलांच्या शिक्षणात विविध माध्यमांचा वापर करून भोवतालच्या समाजाशी त्यांचे नाते जोडणे, शिक्षणाची त्यांना गोडी लावणे हे इथेच घडू शकते. या वर्गाला समाजाशी जोडण्याची प्रक्रिया शाळेत सुरू होऊ शकते, समाजाशी संवाद साधण्याचा प्रारंभ या शाळेपासून होऊ शकतो हे जाणवले व ठरवले या शाळांपैकी काही शाळांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेऊ या. याच दरम्यान 'सेव्ह द चिल्ड्रन, कॅनडा' या संस्थेच्या अधिकाऱ्यांची पुण्यात भेट झाली आणि त्यांच्या आर्थिक सहाय्याने हा प्रकल्प प्रत्यक्ष आकारास आला.

इतर सर्व योजनांसारखीच आश्रमशाळा ही पण सरकारी

योजना आहे. लहान वर्ग, त्यात क्षमतेपेक्षा अधिक मुलं, प्रत्येक कामात दफ्तर दिरंगाई आणि मुख्य म्हणजे हाती घेतलेल्या कामाविषयीची उदासीनता वगैरे परिस्थिती इथेही आहेच. मुलांनी शाळेत यावं म्हणून गणवेष, जेवण वगैरे पुरविले जाते पण मुलांना शाळेत यावसं वाटावं यासाठी अधिक काही करण्याची गरज आहे, असते. आणि म्हणूनच तिथल्या मुलांशी गप्पा, गोष्टी, गाणी, आणि शिक्षकांशी चर्चा सुरू केली आणि हे करता-करता वाटलं या मुलांच्या अभ्यासक्रमावर आधारित काही सत्रे आपण नक्कीच घेऊ शकतो आणि विविध माध्यमांचा वापर करुन त्यांचे शैक्षणिक वातावरण अधिक रंजक, अर्थपूर्ण करू शकतो.

नाशिक जिल्ह्यातील ३२ आश्रमशाळांपैकी ७ शाळा निवडल्या, त्यांना भेटी दिल्या आणि त्यातून दिंडोरी तालुक्यातील ननाशी व इगतपुरी तालुक्यातील देवगांव या दोन शाळांची निवड या उपक्रमासाठी निश्चित केली. हा उपक्रम हाती घेतला पण आम्ही कार्यकर्ते या क्षेत्रात नवीनच होतो. विद्यार्थी-शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थी, इतर कर्मचारी व विद्यार्थी या सर्वांचे नातेसंबंध या निमित्ताने अनुभवायला मिळणार होते. मुलांचा अभ्यासक्रम व त्यांच्या समस्याही जाणून घेण्याची इच्छा होतीच.

सुरुवातीला आम्ही फक्त पाचवीच्या वर्गावर सत्रे घेत होतो. गाणी, गप्पा, गोष्टी हे करता करता त्यांच्या विषयांचा अभ्यास सुरू करून त्यांच्या शिक्षणात आनंद निर्माण करणारे काही धडे निवडून, त्यावर काही माध्यमे बनवून ती मुलांसोबत वापरली.

कामाची उद्दिष्टे दोन होती - एक प्रत्यक्ष आणि दुसरं आनुषंगिक. म्हणजे मुलांना शिक्षणाची गोडी लागावी, त्यांचं मनोरंजन व्हावं,- हे प्रत्यक्ष उद्दिष्टांमध्ये होतं. तर मुलं कशी शिकतात, माध्यमांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन काय हे जाणून घेणे हे अप्रत्यक्ष उद्दिष्ट होते.

या संपूर्ण उपक्रमात मुलं ही आमचा केंद्रबिंदू होतीच पण शिक्षकही तेवढेच महत्वाचे होते. शिक्षकांचे नातेसंबंध दृढ होण्यासाठीही तेवढेच प्रयत्न आम्ही करत होतो. त्यासाठी आम्ही वेगवेगळी चर्चासत्रे, वेळोवेळी बैठकीही घेत होतो. त्याचा परिणामही दिसत होता. या गोष्टी व्हायला वेळ लागला पण फरक आम्हाला जाणवत होता.

मुलांसोबत काम करतांना ते तीन टप्प्यांत करायचे असे ठरवले होते. इ.चौथीचा वर्ग हा प्राथमिक गट, इ.पाचवीचा वर्ग मुख्य गट व इ.सहावीचा वर्ग पाठपुरावा गट, हे ते तीन टप्पे. प्राथमिक गट म्हणून इ.चौथीचा वर्ग अशासाठी निवडला होता की या मुलांची ओळख होऊन त्यांच्याशी पुढच्या वर्गात काम करायला सोपं होईल. इ.पाचवीचा वर्ग प्रमुख गट म्हणून होता. या वर्गातील बहुतेक मुलांना शिक्षणाचे महत्व पटलेले असते, पुढे शिकायची इच्छा असते. त्यामुळे गळतीचे प्रमाणही कमी होते. म्हणून अशा गटातील मुलांना शिक्षणाविषयीचा एक वेगळा दृष्टिकोन मिळावा यासाठी हा 'मुख्य' गट ठरवला. पुढील वर्गात गेल्यावर मागील वर्षातील प्रक्रियेचा पाठपुरावा करण्यासाठी इ.सहावीचा वर्ग निवडला. या तीनही वर्गात गाणी, गप्पा-गोष्टी हे करत होतो. त्याला जोडून त्यांना आणखी काय द्यावं म्हणजे त्यांना वेगळं काही शिकायला मिळेल ? याचाही विचार करून त्या गोष्टी मुलांसोबत करत होतो.

या सत्रांमध्ये मुलांना शिवणकामापासून ते स्वतःचे वर्तमानपत्र कसे तयार करायचे येथपर्यंत वेगवेगळ्या प्रकारची सत्रे घेतली होती. यामध्ये त्यांच्या शालेय विषयांना धरूनही काही सत्रे घेतली होती.

उदा. मुलांना पोस्टाची रचना कशी असते हे दाखविण्यासाठी वर्गातच पोस्ट ऑफिस भरवले होते. (सत्र ५)

मुलांना सोपं शिवणकाम यावं, तुटलेली बटणे शिवता यावीत, रफू करता यावं म्हणून मुलांना शिवणकामही शिकवलं व त्याचा फायदा आम्हाला दिसून यायला लागला. मुलं फक्त आपलेच कपडे नव्हे तर आपल्या लहान भावंडांचेही कपडे शिवू लागली !

मुलांचा शब्द संग्रह वाढावा, वेगवेगळे शब्द माहीत व्हावेत म्हणून मुलांना शब्दकोडी सोडवायला दिली होती. (सत्र १२)

मुलांच्या मनात बेरीज-वजाबाकीच्या संकल्पना घट्ट व्हाव्यात म्हणून सापशिडीचा खेळ घेतला होता. (सत्र २)

अशा प्रकारची सत्रे मुलांबरोबर 'हिट' होत होती. तर अशीही काही सत्रे झाली ज्यातून आम्हाला आपणही अभ्यास करायला हवा याची जाणीव होत होती. एकदा आम्ही

मुलांसोबत 'पृथ्वीचे अंतरंग' हे सत्र घेतले. मुलांना अंतरंगाची माहिती पोस्टरद्वारे दिली. असं वाटत होतं की आपलं हे सत्र खूपच छान झालंय् म्हणून. मुलांनी लगेच प्रश्न विचारायला सुरुवात केली. त्याप्रमाणे आम्हीही उत्तरे देत होतो. पण एका मुलाने विचारले 'पण ताई, शास्त्रज्ञ पृथ्वीच्या पोटात कसे गेले ?' आणि इथे आम्ही थोडेसे ओशाळलो, कारण आम्हालाही हे माहीत नव्हते. 'पुढच्या भेटीत उत्तर देऊ' असं आश्वासन दिलं. पण ते देऊ शकलो नाही.

मुलांशी आमची मैत्री होणं ही एक मोठी प्रक्रिया होती. पहिल्यांदा तर ही मुलं नुसतीच गालात हसायची, बोलायला गेलं तर लाजायची. ह्यांना कसं बोलतं करायचं हा आमच्यापुढे प्रश्नच होता म्हणून मग आम्ही 'गंमतजत्रा' ठेवली. (सत्र २२) प्रत्येक वर्गातील मुलं येऊन खेळ खेळून जात होती. त्यांच्याशी बोलून आम्ही खेळ समजावून सांगत होतो. मुलांना आम्ही थोडेसे जवळचे वाटायला लागलो व अशा प्रकारे आमची मैत्री झाली. या गंमतजत्रेतील खेळ मुलांनी कधीच खेळले नव्हते त्यामुळे त्यांना खूपच मजा वाटत होती. मुलांनी या गंमत जत्रेविषयी लिहिले. "आम्हाला सगळे खेळ खूप आवडले कारण ह्या असे खेळ आम्ही कधीच खेळलो नव्हतो आम्हाला ते खेळ खेळतांना खुप मजा वाटत होती खेळ खेळतांना आम्ही लहान आहे असे वाटत होते. कारण ते खुप सोपे होते व आनंदही वाटत होता." (ही एका मोठ्या वर्गातील मुलाची प्रतिक्रिया जशीच्या तशी उद्धृत केली आहे.) मुलं आपली प्रतिक्रिया/मतं अशी लिहून व्यक्त करीत होती तर काही पत्रानेही कळवत होती. मुलांची ही पत्रे खूपच मजेशीर ! सुरुवात तर 'ताई', 'दादा', 'मित्र', 'मैत्रीण' अशीही असे. त्यामुळे ती अधिकच जवळची वाटत. छोट्यांनाही पत्र लिहायचं असे, पण शब्दात मांडणं जमत नव्हतं ! अशा वेळी चित्र काढून तर कधी कोरंच पोस्टकार्ड आमच्या नावाने पाठवत असत. मुलांचं प्रेम बघून आम्हाला भरून येई.

मुलांशी आम्ही जेवढे मैत्रीपूर्ण वागत होतो तसेच नाते आमचे शिक्षकांशीही होते. मुलांशी हे मैत्रीचे नाते तयार करण्यासाठी आम्हाला जेवढा काळ लागला त्याच्यापेक्षा जास्त काळ शिक्षकांशी मैत्री करण्यास लागला. त्यांच्याशी वेगवेगळ्या विषयावर गप्पा मारणे, त्यांच्या घरी जाणे यामुळे त्यांच्या घरच्यांनाही आम्ही जवळचे वाटू लागलो. सर्व शिक्षक आणि त्यांची घरची मंडळी सहसा एकत्र येत नाहीत म्हणून मग त्यांच्यासाठी एक वेगळा मेळावा (सहल व खेळ) आयोजित

केला. त्याद्वारे त्या सर्वांशी चांगली ओळख होण्यासही मदत झाली. यामध्ये सर्व एकत्र येतील असा खेळ घेतला व त्यावर थोडक्यात चर्चाही घेतली. तसंच हा उपक्रम मुलांच्या दृष्टीने कितपत योग्य आहे यावर गप्पा झाल्या. सर्वांनीच सहलीचा आनंद मनसोक्त लुटला.

शिक्षकांचे आणि मुलांचे नातेसंबंध दृढ होण्याकरता शिक्षकांसाठी शिबिरेही आयोजित केली होती व त्याचा परिणाम दिसूनही यायला लागला. हा शिक्षकांमधला बदल आम्हाला त्यांच्या वर्गावरही दिसून यायला लागला. काही शिक्षकांनी आपणहून वर्ग सजवायला सुरुवात केली. मुलांशी बोलतांना, शिकवतांना त्यांच्यामध्ये बदल झालेला जाणवायला लागला.

मुलांमधेही बदल जाणवत होता. पूर्वी खूप अबोल राहणारी, लाजणारी मुलं आता खूप धीट होऊन प्रश्नांची उत्तरं द्यायला लागली आणि त्यांचं म्हणणं ठामपणे मांडण्याची शक्ती त्यांच्यात तयार होऊ लागली. आम्ही मुलांना लिखाणास वेगवेगळे विषय देत असू. या सगळ्या लेखांना एक व्यासपीठ मिळावं म्हणून '**आमची आशा**' भित्तिपत्रक सुरु झालं. मुलांच्या भाषेच्या/लिखाणाच्या चुका न सुधारता जसं आहे तसंच ते छापत असू. हे मुलांनी - मुलांसाठी चालवलेलं भित्तिपत्रक आहे. मुलं खूपच निर्भयपणे आपले विचार याद्वारे मांडत आहेत. विशेष म्हणजे हे भित्तिपत्र साऱ्या आश्रमशाळांत पाठविल्यामुळे आता यामध्ये इतर शाळांतील मुले आपले विचार मांडायला लागली आहेत.

**कार्यकर्त्यांचे काही अनुभव -**

**वंदना ताई**

मुलांचं कितीही कौतुक वाटत असलं तरी कधीकधी रागही येई. एकदा वर्गात सत्र सुरु करायचं होतं. मुलांचा गोंगाट सुरुच होता. शांत बसल्याशिवाय सत्राला पुढे सुरुवातच करता येत नव्हती. काही मुलं वर्गातून न सांगता बाहेरही जात होती. खूप राग येत होता. मग मुलांना सांगितले, "तुम्हाला शांत बसायचं नाही ना मग मीच शिक्षा घेणार. उभी राहणार तुम्ही शांत बसेपर्यंत". पण मुलांचा आवाज तसाच. माझ्या डोळ्यात पाणी यायला लागलं, काही मुली माझ्या शेजारी येऊन उभ्या राहिल्या, त्याही रडायला लागल्या. आता वर्गात काहीतरी होतंय् याची जाणीव सर्व मुलांना व्हायला लागली आणि हळूहळू ती शांत झाली. 'आम्ही पुन्हा असं करणार नाही' असंही स्वत: म्हणाली. शेवटी बऱ्याच वेळानं सत्र सुरु केलं.

मनात सारखा विचार येत होता की नेहमी मुलांना शांत बसवायला मला असंच करावं लागेल का ? काहीतरी उपाय नक्कीच शोधायला हवा. त्याच दरम्यान जॉन होल्ट या शिक्षणतज्ज्ञ लेखकाचं 'हाऊ चिल्ड्रन लर्न' हे पुस्तक वाचनात आलं. त्याने मुलांशी काम करतांना बऱ्याच गोष्टी प्रयोगात्मक करून पाहिल्या व त्याचा त्याला चांगला अनुभव आला. त्यातला एक प्रयोग मीही करुन पाहायचा ठरवला. मुलांना सांगायचे तुम्हाला जेवढा गोंधळ घालायचा असेल तेवढा घाला, पण मी फळ्यावर 'Q' हे अक्षर काढून पूर्ण केलं की कोणी एक अक्षरही बोलायचे नाही. वर्गात गेल्यावर मुलांना हे सांगितले तर त्यांनी खूप गोंधळ घातला. शेजारी शिकवणारे शिक्षकही या वर्गात डोकावले. मी फळ्यावर 'Q' अक्षर लिहीत होते. जसजसा 'Q' पूर्ण होत होता गोंधळ वाढत होता. एकदाचा 'Q' पूर्ण झाला आणि वर्गात निरव शांतता पसरली. हीच कल्पना मग मी नेहमी वापरत गेले. त्याचा फायदा नक्कीच होत होता.

- आमच्या एक लक्षात आलं की, ही सत्रं घेतांना मुलांच्या चेहऱ्यावर उत्साह ओतप्रोत भरलेला असायचा, पण एरवी त्यांना काही अभ्यासाविषयी विचारलं की चेहरे मख्ख. असंच एकदा आम्ही मुलांना धरणाकाठी फिरायला घेऊन गेलो. खूप मजा केली. येतांना एका आंब्याच्या झाडाखाली आम्ही उभे होतो. मुलांनी आपली शक्कल लढवली, "अरे, ताईला कैऱ्या द्या म्हणजे त्या आज इथंच राहतील." लालूच दाखवून मुलं मला थांबवू पाहत होती. मुलांचं असंच खेळीमेळीचं वागणं शिक्षकांबरोबर झालं तर — असा एक विचार ही मनात चमकून गेला.

- मुलांबरोबरचं सत्र झालं नी मी वर्गाबाहेर येऊन बसले. माझ्या शेजारी बसायला सगळ्याच मुलांना हवं होतं. त्यातल्या महेंद्रने विचारलं, 'ताई तुम्हाला हे कपडे तुमच्या ऑफिसने दिलेत ?' मी एकदम माझ्या कपड्यांकडे पाहिले. आज मी नेहरु कुडता घातला होता. मला हसू आलं. त्याला म्हटलं 'असं कारे विचारलंस?' 'नाही तुमचे सगळे लोक असेच कपडे घालतात'. 'कधी पाहिलसं ?' माझा प्रश्न. 'ते साक्षरतेचा कार्यक्रम करायला आले होते ना तेव्हां'. 'ही माझी हौस म्हणून हे कपडे घातले'. आणि आमचा संवाद येथेच संपला. कारण इतर मुलांनाही माझ्याशी बोलायचं होतं.

- मुलांइतकचे शिक्षकांबरोबर आमचे संबंध चांगले दृढ झाले

आहेत. असचं एकदा सर्व शिक्षकांबरोबर मीटिंग घेऊन सहलीचा प्रस्ताव मांडला. सर्वांना तो आवडला व उचलून धरला. मीटिंग झाल्यावर आम्ही निघालो, वाटेत देवगांवच्या गवळी बाई भेटल्या. कसं कोण जाणे पण एकदम माझा हात हातात घेतला आणि म्हणाल्या, "बरं झालं आमच्या मुलांची सहल काढताय ते. छान वाटेल त्यांना !" मला खूप बरं वाटलं. कारण कोणतंही असो पण शिक्षिकांनाही मी जवळची वाटायला लागली होते. त्यानंतर आमच्या खूप गप्पा झाल्या, पण हात हातातच होते. त्या दिवशी आपण आणखी एक पायरी गाठल्याचा आनंद झाला.

**किरण दादा -**

- एखाद्या दिवशी जर आश्रमशाळेवर जाणं झाले नाही तर मुलं पत्र लिहून विचारपूस करीत, पत्रातून आमच्या विषयीच्या त्यांच्या भावना कळवत. आम्हाला मुलांनी पाठवलेल्या या पत्रांचं फार कुतूहल वाटतं. १५ पैशाचं कार्ड किंवा ७५ पैशाचं आंतर्देशीय पत्र विकत घेऊन पाठवणं, स्वतःच्या खाऊतील पैसे खर्चून पत्र विकत घेणं हे आम्हाला अतिमोलाचं वाटतं, कारण अशी पत्र मुलं फक्त आपल्या घरच्यांना लिहितात. म्हणून आमचं व मुलांच नातं हे त्यांच्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणे आहे असं वाटतं.

- 'आमची आशा' सारख्या माध्यमातून मुलांची मते जाणून घेण्यास मदत होते हे शिक्षकांच्या लक्षात येत होतं. एका शिक्षकाने इ.सहावीच्या वर्गावर आमच्यासारखा प्रयोग केला. वर्गातून मुलं पळून जायची, म्हणून शिक्षकाने विषय दिला की, 'मी वर्गातून का पळून जातो?' त्यावर तुम्हाला जे काही लिहायचे असेल ते कोणाच्याही दडपणाखाली न राहता, न घाबरता लिहावे. असे विद्यार्थ्यांना सांगून लेखन स्वातंत्र्याची संधी दिली व विद्यार्थ्यांच्या लेखनातून ते का पळून जातात याचा अभ्यासही केला. हा अनुभव अत्यंत महत्वाचा व आमच्या कामाचं जणु फळ म्हणून आम्ही बघतो.

- दुसरा एक अनुभव नमूद करावासा वाटतो तो म्हणजे तिसऱ्या वर्षीच्या सांस्कृतिक मेळाव्याचे संपूर्ण नियोजन व आयोजन शिक्षक व विद्यार्थी यांनी मिळून केले . विशेष म्हणजे शिक्षक प्रत्यक्ष सर्व उपक्रमामध्ये सहभागी झाले. उदा. मातीकाम करतांना शिक्षकही मातीत हात घालून मुलांना माती वाटप करीत होते जे दोन वर्षांपूर्वी आम्ही केले होते. म्हणून असंही वाटते की, आमच्या या तीन वर्षांच्या काळात

शिक्षकांवर कुठल्याही प्रकारचा दबाव, म्हणजे - तुम्ही विद्यार्थ्यांसोबत सहभागी झालचं पाहिजे - असा आग्रह नव्हता. आम्ही प्रथम सहभागी होत होतो आणि हेच पाहून शिक्षकही स्वतःहून सहभागी होण्यास तयार होत होते. या उपक्रमातून शिक्षक व विद्यार्थी यांना एकमेकांजवळ आणण्याचा प्रयत्न आम्ही केला.

- सहल नेण्याचं ठरवलं तेव्हा विद्यार्थ्यांचा उत्साह खरंच बघण्यासारखा होता. या सहलीतील स्थळे, नाणे संशोधन केंद्र, रेल्वे स्थानक, सोमेश्वर, मुक्तिधाम आणि आमचं कार्यालय अशी होती. सहल न्यायची म्हणजे आदिवासी विकास भवन मधून प्रकल्पाधिकाऱ्यांच परवानगी पत्र आवश्यकच होतं. ते मिळवण्यासाठी बरेच प्रयत्नही करावे लागले. मनात धाकधूक चालू होती जर पत्र मिळालं नाही तर मुलांना काय उत्तर देणार. पण सहलीच्या आदल्या दिवशी ते पत्र मिळाले. रात्री ११.०० वाजता आश्रमशाळेत पत्र घेऊन पोहोचलो. शिक्षक - विद्यार्थी पत्राची व माझी वाटच बघत होते. मला पाहून मुलांनी एकच गलका केला 'किरण दादा आला' आणि माझा थकवा नाहीसा झाला.

**जॉर्ज दादा -**

- एकदा शाळेत मुलांपैकी एकाने कोणाची तरी वस्तू न सांगता घेतली. याची चर्चा शिक्षक आपआपसांत करत होते. ज्याने वस्तु घेतली त्या विद्यार्थ्याला शिक्षकांसमोर उभे केले. तेथे मीही त्या चर्चेत सहभागी होतो. शिक्षकाने त्या विद्यार्थ्याला मारायला सुरुवात केली. आम्ही मुलांसोबत प्रेमाने वागण्याचा प्रयत्न करत होतो. तर येथे शिक्षक स्वतःच आमच्यासमोर विद्यार्थ्याला मारत होते. शिक्षकांना समजावण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचे उत्तर 'तुम्ही मध्ये पडू नका, हा आमच्या व्यवस्थापनाचा प्रश्न आहे'. त्यावेळी मी काही करु शकलो नाही, पण मनात या शिक्षेबद्दल काही तरी करण्याची इच्छा होती. याची जाणीव शिक्षकांना व्हावी यासाठी आम्ही 'शिक्षेला पर्याय काय' असे एक सत्र शिक्षकांसोबत घेतले. याचा फायदा बऱ्याच प्रमाणात होत असलेला आम्हाला दिसून येऊ लागला.

- मुलांना गाणी खूपच आवडतात. म्हणून दर सत्राच्या सुरुवातीला व सत्राच्या शेवटी एक गाणं घ्यायचं असं ठरवलं. त्यामुळे मुलांना वेगवेगळी गाणी यायला लागली व त्यांचा अभ्यासातील हुरूप वाढायला लागला.

**पुस्तिकेचं प्रयोजन** -

हे सगळं घडायला पूर्ण तीन वर्षांचा कालावधी लागला. पण हे काम इथेच थांबलेलं नाही. ह्याला आणखीही पुढे न्यायची गरज आहे. म्हणून आम्हाला असं वाटलं की आमचे हे सारे अनुभव, त्यातुन निघालेलं हे नवनीत इतरांपर्यंतही पोहचवावं.

आदिवासी आश्रमशाळेतील मुले हा समाजातील एक वंचित गट आहे. असे इतरही वंचित मुलांचे गट आहेत - शहरी झोपडपट्टीतील मुले, रस्त्यावर राहणारी मुले, संस्थांमधून राहणारी मुले इ. आणि अनेक कार्यकर्ते अशा मुलांसोबत काम करत असतात. मुलांचा अभ्यास घेताना, त्यांचा अभ्यास करणं, पुस्तकाबाहेरचं बरंच काही त्यांना पोहचवणं, त्यांच्या मनात, व्यक्तिमत्वात दडलेले विचार कल्पना, भावना जागवणं असं खूप काही करणं शक्य असतं. या पुस्तिकेद्वारे अशा कार्यकर्त्यांपुढे फक्त काही कल्पना मांडल्या आहेत. ही पुस्तिका परिपूर्ण नाही, संपूर्ण नाही. पण मुलांशी सुसंवाद खुला करण्यासाठीचा हा एक मार्ग आम्ही मांडला आहे. हे खेळ, ही सत्रे अशीच्या अशी वापरली जावी अशी अपेक्षा नाही. पण त्यापासून प्रेरणा मिळून, नवीन कल्पना वापरून इतरांनी सुसंवादाच्या अनेक पाऊलवाटा तयार कराव्या असं वाटतं. हेच या पुस्तिकेचं प्रयोजन. या पुस्तिकेचा वापर करून आपण हे काम अधिकाधिक मुलांपर्यंत पोहचवावं, त्याआधी या उपक्रमाच्या उगमापासून तर आत्तापर्यंतचा कालावधी आपल्याला माहीत व्हावा या उद्देशाने लिहिलेली ही मोठी प्रस्तावना.

**मुलांसोबत सत्रे घेतांना** -


- वातावरण मोकळं आणि मनोरंजक राखल्यास मुलं खुलतात.
- आपला प्रत्यक्ष सहभाग असल्यास मुलं मोकळेपणाने सहभागी होतात.
- आपण सांगण्यापेक्षा प्रश्न विचारून मुलांना बोलते करावे.
- भाषा सहज, सोपी असली तर मुलांना रस वाटतो.
- आलेले अनुभव आपली दृष्टी सखोल करणारे असतात, पुढील दिशा दाखवणारे असतात, त्यांच्या नोंदी कराव्यात, सहकाऱ्यांसोबत चर्चा करावी.
- ही सत्रे केवळ दिशादर्शनासाठी आहेत, यात गरजेनुसार बदल करता येतील, नवे विषय, नवी हाताळणी वापरता येईल.

# चला शिकूया मुळाक्षरं

हे सत्र घेण्याचा उद्देश होता मुलांना इंग्रजी या विषयाची अक्षर ओळख व्यवस्थित व्हावी. हे सत्र ठरविण्याअगोदर मुलांना आम्ही इंग्रजीतील काही अक्षरं ओळखायला दिली होती. परंतु ती ओळखण्यास बऱ्याच जणांना त्रास होत होता. एखाद्या खेळाद्वारे आपण हे समजावून सांगू शकू का ? यावर विचार केल्यावर आम्ही यासाठी कल्पफलक (फ्लॅनेल ग्राफ) हे माध्यम ठरविले. कारण यामधे एकतर त्याक्षणी लिहिण्याची गरज नसते. जे साहित्य असेल ते फक्त कापडावर लावायचं व हवं तितक्या वेळा त्याचा वापर करायचा. यासाठी आम्ही अक्षर कार्डेही बनविली होती. मुलांना आम्ही छोटी लिपी, मोठी लिपी, त्या अनुसरून चित्रं दाखवली, त्यांना इंग्रजीत काय म्हणतात हेही सांगितले. मग स्वत: मुलांनी समोर येऊन ती लावून बघितली. मुलांना जी चित्रं आम्ही दाखवली त्यातील बऱ्याच गोष्टींची इंग्रजीत असणारी नावं त्यांना माहीत नव्हती. म्हणूनही हे सत्र आवडलं.

अक्षर कार्डांचंही तसंच. कार्डे मुलांना वाटली. यामधे छोटी लिपी. मोठी लिपी यांच्या जोड्या लावून एका मागे एक उभं रहायला लावलं. जोड्या निवडतांना त्यांच्या दोन रांगा केल्या व कोणीतरी एक जण लिपी सांगून त्याप्रमाणे दोघांनी पुढं यायचं. यामधेही बरीच धमाल उडत होती. कोणाकोणाला समजतच नव्हतं की आपल्याकडे कोणत्या लिपीचं कार्ड आहे. शेवटी सर्वांच्या सहकार्याने लिपी पूर्ण झाली.

'चला शिकूया मुळाक्षरं' हे सत्र आपल्याला कोणत्याही वर्गावर घ्यायला हरकत नाही. आमचा हा अनुभव इंग्रजी मुळाक्षरांपुरताच मर्यादित होता. पण आम्हाला असं वाटतं की हा अनुभव जर लहान वर्गांपासूनच दिला तर त्यांना देवनागरी 'मुळाक्षरं' शिकण्यात गोडी येईल. हा अनुभव मुलांना खूपच आनंददायक वाटला.



साहित्य :

- जाड कागदाचे ५ सेंमी X ५ सेंमी आकाराचे तुकडे
- रंगीत पेन / काळं पेन
- घोंगडी / शाल
- जाड कागदाच्या मागे लावण्यासाठी डिंक व मखमलीचा कागद (वेलवेट पेपर) / भिंत घासायचा कागद (पॉलीश पेपर)
- कात्री

- जाड कागदावर मुळाक्षरं तयार करणं
- मुळाक्षरं तयार झाल्यावर त्याच्या मागे मखमलीचा किंवा भिंत घासायचा कागद चिकटवणं.


सादरीकरण :

- सर्व मुलांना अर्धगोलाकार बसवणं.
- त्यांच्यासमोर ब्लँकेट किंवा शाल लटकवणं.
- आपणही त्यांच्या शेजारी बसून एक एक मुळाक्षराचं कार्ड फलकावर लावणं व मुलांना ते कोणतं आहे हे ओळखण्यास उद्युक्त करणं.
- प्रत्येकाला संधी मिळेल असं बघावं.

मराठी, हिंदी, इंग्रजी कोणतीही मुळाक्षरं ह्याद्वारे शिकवता येतील. नव्यानेच शिकणाऱ्या मुलांना ते नक्कीच आवडेल. वेगवेगळे शब्द, चित्रातून गोष्ट इत्यादी तयार करायला हे माध्यम उपयोगी ठरणारं आहे.

संदर्भासाठी पुस्तक -

- 'वाचन शिक्षण' - चिं.गो. सहस्त्रबुद्धे, जयदीप प्रकाशन, १०५ नारायण पेठ, आनंदश्री को-ऑप.हौ.सोसायटी, पुणे-४११ ०३०.



# गाढवाची फजिती

मुलांना गोष्टी ऐकायला खूप आवडतं. त्यात जर चित्रे असतील तर आणखीनच मजा ! या सत्रासाठी आम्ही फ्लॅनल ग्राफ (कल्पफलक) या माध्यमाचा उपयोग केला. या माध्यमाचा प्रभाव खूपच होतो, हे आम्हाला अगोदरच्या अनुभवातून जाणवले होते. या सत्रासाठी आम्ही जी गोष्ट निवडली होती ती हिंदी भाषेतील होती. मुलांना हिंदी बोलायला आवडते. म्हणून त्यांना ही गोष्ट हिंदीतून ऐकवली व सांगायलाही लावली. मुलांना बोलतं करण्यासाठी, त्यांच्यातील बुजरेपणा घालवण्यासाठी याचा उपयोग झाला. मुलांनी स्वत: ही गोष्ट चित्रांचा वापर करुन सांगितली काहींनी ती हिंदीत तर काहींनी मराठीत सांगितली. त्यांना खूपच आनंद झाला होता. म्हणूनच हे सत्र तेवढेच महत्वाचे वाटते. गोष्ट सांगतानाही आपण कल्पफलकाचा उपयोग करू शकतो. गोष्ट जसजशी पुढे जाते तसं मुलं गोष्ट ऐकण्यात रंगून जातात. यातच मुलांना प्रश्न विचारून ही गोष्ट पूर्ण करता येईल.

उदाहरण म्हणून आपण खालील गोष्ट पाहू.



| उदा. गोष्ट | चित्र |
|---|---|
| - एक व्यापारी होता. | - व्यापाऱ्याचं चित्र |
| - त्याच्याकडे एक गाढव होतं. | - गाढवाचं चित्र |
| - व्यापारी गाढवाच्या पाठीवर सामान लादून ह्या गावाहून त्या गावी व्यापार करत असे. | - गाढवाचे सामानसह चित्र |
| - एके दिवशी व्यापारी मिठाचं ओझं गाढवावर लादून व्यापारासाठी निघाला. | - व्यापारी - गाढव चित्र |
| - त्यांना एक नदी ओलांडून पुढे जायचं होतं. | - नदीचं चित्र |
| -नदीतून चालता चालता गाढवाचा पाय घसरला व ते पडलं. | - बसलेल्या गाढवाचं चित्र |
| - थोडा वेळ ते तसंच बसून राहिलं. व्यापाऱ्याने त्याला उठवलं. ओझं हलकं झालं होतं. | - कमी ओझ्याचं चित्र |
| - दुसऱ्या वेळेस व्यापाऱ्याने गाढवाच्या पाठीवर कापूस/विटा लादल्या.ह्या वेळीही आधीच्याच रस्त्याने निघाला. वाटेत नदी लागली. गाढवाला आठवलं, नदीत पडल्याने आपलं ओझं कमी झालं होतं. म्हणून त्याने ह्यावेळीही पाण्यात बसकण मारली. | - बसलेल्या गाढवाचं चित्र (आधीचं) |
| - ओझं हलकं करण्याचा त्याचा प्रयत्न होता. परंतु विटा / कापसामध्ये पाणी शिरलं व ते ओझं आणखीनच जड झालं. | - ओझ्याने वाकलेलं गाढव |

येथे गोष्ट संपवून मुलांना काही प्रश्नही विचारता येतील.

१) गोष्ट कशी होती ?

२) गोष्टीत काय काय घडत होतं ?

३) पहिल्यावेळी ओझं हलकं का झालं ?

४) दुसऱ्यावेळेस ओझं जड का झालं ?

मिठाचं विरघळणं, विटांच जड होणं अशा छोट्या छोट्या वैज्ञानिक गोष्टीही मुलांना समजावून सांगता येतील. गोष्ट कोणत्याही भाषेत सांगता येईल. तसेच गोष्टीची चित्रं अगोदर तयार असली म्हणजे केव्हाही व कुठेही ही गोष्ट दाखवता येण्यासारखी आहे.

# खरेदी करायला शिकू या !

इयत्ता पाचवीच्या वर्गावर मापन एकके हे सत्र खूपच वेगळ्याप्रकारे घेतलं होतं. त्यांच्या पुस्तकात मापन एकके हा धडा आहे. मुलांच्या लक्षात कितपत आहे हे पडताळून घेण्यासाठी व माहीत नसेल तर समजावून सांगण्यासाठी आम्ही हे सत्र मुलांसोबत घेतलं. त्यासाठी एक पोस्टर तयार केलं होतं. वर्गात गेल्यावर सर्व मुलांना गोलात बसवलं व नंतर त्यांना एककांविषयी विचारलं. सेंटीमीटर म्हणजे किती? त्यात किती मिलीमीटर असतात ? मुलांना हे काही सांगता आले नाही. म्हणून मग आम्ही त्यांना वेगळ्याप्रकारे समजावून सांगितले. वहीत एक सेंटीमीटरचे अंतर काळण्याकरता कुठून कसं मोजायचं हेही सांगितलं. त्यानंतर मीटरचं अंतर जमिनीवर काढून त्यांना ते गटाने मोजायला दिलं. छोट्या पट्टीने अंतर मोजत असल्यामुळे शंभर ऐवजी एकशे दहाच्या आसपास ते मोजत होते. कुठेतरी गडबड होत आहे असं लक्षात आल्यावर त्यांना पुन्हा मोजायला लावलं. तेव्हा कळलं पट्टीच्या दोन्ही बाजूला असलेली रिकामी जागा मुलं अंतरामध्ये मोजतं होती त्यामुळे अंतर जास्त होत होतं. अंतर कसं मोजायचं ते पुन्हा सांगितलं. खूप प्रयत्नांनी त्यांनी शोधलं की एका मीटरमध्ये शंभर सेंटीमीटर असतात. त्याचबरोबर त्यांनी त्यांची स्वतःची उंची देखील मोजली. किलोमीटर कशासाठी वापरतात हेही मग मुलांनीच सांगितलं. मुलांना हे सगळं करतांना खूपच आनंद होत होता. हा सगळा आनंद पाहून व त्यांना प्रत्यक्ष अनुभवाची संधी लक्षात घेऊन आम्हाला असं वाटलं की हा पाठ वेगळ्या प्रकारेही शिकवता येण्यासारखा आहे. त्यातून व्यवहारज्ञानही मिळेल. म्हणूनच मापन एकके शिकवायला आपल्याकडे एक छान साधन आहे असं आमच्या लक्षात आलं. ते म्हणजे गावातील बाजार.

**खेळ असा खेळायचा :**

बाजाराच्या दिवशी मुलांना बाजारात फिरायला सांगायचं व बाजारात ज्या ज्या गोष्टी आहेत, त्याची खरेदी विक्री कशी करतात याकडे मुलांना नीट लक्ष द्यायला सांगायचं. वर्गात आल्यावर असाच बाजार भरवायचा. सर्व वस्तू विकायला (अर्थातच लुटपुटुच्या) ठेवायच्या. काहींनी आपला माल विकायचा आणि उरलेल्यांनी तो खरेदी करायचा. अशा प्रकारच्या खेळामधून मुलांना पैशांची देवाण-घेवाण कशी

करतात याचंही प्रात्यक्षिक मिळेल. खरोखरच्या बाजारात त्यांना वेगवेगळी वजनं पाहायला, हाताळायला मिळतील. कापड कसं मोजतात, कशाने मोजतात हेही पहायला मिळेल. त्याचबरोबर उंची कशात व कशी मोजतात याचेही प्रात्यक्षिक दाखविता येईल. वस्तूंचं वजन तराजूद्वारे करतात. माणसाचं वजन तराजूने नव्हे तर एक छोट्या यंत्राने करतात हेही दाखवता येईल. तसंच जमिनीवरील अंतर कसं मोजतात याचंही प्रात्यक्षिक करून दाखवता येईल.



साहित्य

- तराजू तयार करणे - दोन पुठ्ठे, दोरी, छोटी काठी
- लहान मोठ्या दगडाचे वजन माप तयार करणे
- उंची मोजण्यासाठी कापड मोजण्याचा टेप
- मिळाल्यास माणसाचे वजन मोजण्याचा वजनकाटा

टीप - आपण जर स्वतःच बाजारात नेऊन फिरवून आणलं तर मुलांना वेगवेगळी वजनमापं व्यवस्थित पहायला मिळतील. त्यासाठी आपल्याला थोडा वेळ काढावा लागेल किंवा थोड्या वेळासाठी दुकानदाराकडून वजनमापं घेऊन ती मुलांना दाखवता येतील.

# खेळातून गणित

गणिताच्या मूळ संकल्पना म्हणजे बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार. ह्या संकल्पना मुलं शाळेच्या पहिल्या वर्गापासूनच शिकत असतात. शिकवण्याच्या पद्धतीमध्ये थोडा बदल केला तर आपलं नेहमीचं शिकवणं ही मजेदार होऊ शकतं.

आपण बेरीज आणि वजाबाकीच्या संकल्पना मुलांना आणखी चांगल्याप्रकारे कशा समजावून सांगू शकू ह्याचे एक उदाहरण. आपल्या सर्वांना सापशिडी या खेळाची पूर्ण माहिती आहे. फासे टाकत टाकत आपण आपला मार्गक्रम पूर्ण करत असतो. ह्याच सापशिडीचा उपयोग आपण बेरीज/वजाबाकी शिकवण्यास करु शकतो.


हे सत्र आम्ही इयत्ता चौथी आणि इयत्ता पाचवीच्या वेगवेगळ्या वर्गांवर घेतले होते. मुलांचा उत्साह खूप होता. वर्ग भिन्न होते, भिन्न वयोगट होता तरी उत्साह सर्वत्र सारखाच होता. मुलांना सापशिडीचा खेळ माहीत नव्हता म्हणून अगोदर त्यांना तो कसा खेळायचा हे सांगून मनसोक्त खेळायला दिले. त्यानंतर बेरीज, वजाबाकी कशी करायची हे सांगून त्यांना पुन्हा खेळायला दिले. हा खेळ मुलांना खूपच आवडला. खेळतांना मुलं आवाज करत होती त्यातून त्यांना झालेला आनंदच जाणवत होता.

मुलांना बेरीज-वजाबाकीच्या संकल्पना समजून सांगण्यासाठी हे माध्यम आम्हाला उपयुक्त वाटलं होतं. कारण यात सर्वजण एकत्र येऊन खेळत होती. त्यांना गटात मिळून काम, खेळ अशाप्रकारच्या गोष्टी करता येतात, खेळाद्वारे अशाप्रकारे अभ्यास करता येतो हेही मुलांना दाखवून दिले. हा खेळ कोणत्याही वर्गावर घेतला तरी मुलांना तो आनंदच देईल. नेमका उद्देश ठेवून जर खेळ घ्यायचा असेल तर त्यासाठी तयारी असणे आवश्यक आहे.

खेळ असा खेळायचा :

- प्रथम मुलांना सापशिडी कशी खेळायची हे सांगणे.
- गट करून सापशिडीचे तक्ते मुलांना देणे.
- प्रथम त्यांना नुसते खेळू द्यावे.
- एकदा का त्यांना सापशिडी समजली की मग त्यांना वही पेन जवळ घेऊन बसायला सांगणे.
- खेळतांना शिडी आली की, शिडीच्या खालच्या टोकाची संख्या व वरच्या टोकाची संख्या यांची बेरीज करायला लावणे. उदा. ६९+९४=१६३
- तसेच सापाच्या तोंडातून शेपटीकडे आल्यावर तोंडाजवळ असलेली संख्या व शेपटीची संख्या यांची वजाबाकी करायला लावणे. येथे आपोआपच मोठ्या संख्येतून छोटी संख्या वजा होत असते. उदा. ७७-१८=५९

मुलांना खेळातून गंमत येईलच शिवाय बेरीज - वजाबाकी ची संकल्पना मुलांच्या मनामध्ये स्पष्ट होईल. नवीन नवीन गोष्टी शोधून, त्या मुलांपर्यंत पोहोचवून त्यांना त्या समजतात का? आनंद वाटतो का? हे जाणून घेऊन त्यात वेळोवेळी बदल केले पाहिजेत.



- यमुनेच्या तीरी किती बुलबुल असतील हे गाणंही घेता येईल.

**गोणं**

यमुनेच्या तीरी किती बुलबुल असतील, वृक्षावरती हो...
एक तरी दोन तरी तीन तरी असतील
चार तरी पाच तरी सहा तरी असतील
सात तरी आठ तरी नऊ तरी असतील
दहा तरी असतील हो
यमुनेच्या तीरी किती -----
दहा तरी नऊ तरी आठ तरी असतील
सात तरी सहा तरी पाच तरी असतील
चार तरी तीन तरी दोन तरी असतील
एक तरी बुलबुल हो
यमुनेच्या तीरी

हे गाणं दोन गट करुन थोडं चढ उताराच्या स्वरात म्हटलं तर मजाही येईल.

**खेळ**

शिवाजी म्हणतो

आपण स्वतः शिवाजी बनून मुलांना गोलात फिरायला सांगावे. ताल देण्यासाठी टाळ्या वाजवाव्यात. काही संख्या सांगाव्या म्हणजे त्याप्रमाणे मुलं एकत्र येतील. अशा प्रकारे मुलांना खेळातून संख्या शिकवाव्या. बेरीज, वजाबाकी ही करता येईल. अगोदर एक संख्या सांगून मग त्यात एखादी संख्या मिळवणे, कमी करणे असे करता येईल.

पटीतला पाढा

मुलांना पटीच्या संख्या कळण्यासाठी हा खेळ मजेशीर आहे. मुलांना क्रमाने एक, दोन ---- याप्रमाणे अंक म्हणायला सांगावे. नियम असा की पाचाच्या पटीतील अंकाऐवजी 'हं' म्हणायचं. उदा. ज्यांच्यावर ५, १०, १५, २० अशा संख्या येतील त्यांनी फक्त 'हं' म्हणायचं. त्यानंतरच्या मुलाने पुढील अंक म्हणायचा. चुकलं तर पुन्हा एक पासून सुरुवात.

पाच ऐवजी दुसरा एखादा अंक घेऊन त्याच्या पटीतील सर्व अंकाऐवजी 'हं' म्हटलं तर वेगवेगळे पाढे मुलांच्या लक्षात राहतील.

# शिकू या पोस्टाचे व्यवहार

आम्ही जेव्हा हे सत्र वर्गात घ्यायचं ठरवलं तेव्हां ते कसं होईल, आपण जे बोलू ते कळेल का? असा प्रश्न पडला. कारण आम्ही बऱ्याच गोष्टी मुलांना सांगण्याचा प्रयत्न करणार होतो. पण जेव्हां हे सत्र घेतलं तेव्हां आमच्या अपेक्षेबाहेर यश मिळालं. यासाठी आम्ही पोस्टाचे व्यवहार करणाऱ्या आमच्या सहकाऱ्याला घेऊन गेलो. या सत्रासाठी एक मोठी पोस्टाची पेटी व वेगवेगळ्या खिडक्या तयार केल्या होत्या. मुलांना अगोदर सर्व माहिती व्यवस्थित दिली. पोस्टकार्डे कोठे तयार होतात, त्यांची किंमत काय, पिनकोड कशा साठी लिहितात, तिकिटं का लावतात, भेट वस्तू किंवा इतर वस्तू कशा पाठवल्या जातात आणि पैशांची बचत करण्यासाठी कोणती योजना, पद्धती आहे हे सांगितलं. त्यांना प्रत्येक फॉर्म भरून देण्यास मदत केली. नंतर त्यांना हा खेळ कसा खेळायचा हे सांगितलं. मुलांनी आपल्या घरच्यांना पत्र, तार पाठविली.

**खेळ असा खेळायचा**

- वेगवेगळ्या नावांच्या खिडक्या तयार करून किंवा ठराविक जागा ठरवून मुलांना बसवणे. (उदा. तिकिट, मनिऑर्डर, तार अशा खिडक्या)
- पोस्टाची पेटी तयार करणे.
- मुलांना पोस्ट खात्याची सर्व माहिती द्यावी. पोस्टकार्ड, आंतरदेशीय पत्रे दाखवणे. मनिऑर्डर फॉर्म कसा भरायचा, तारेचा मजकूर कसा लिहायचा, वेगवेगळी तिकिटे इत्यादि दाखविणे, पैशाचं तिकिट (रेव्हेन्यूस्टॅम्प - महसुल तिकिट) दाखविणे. हे सर्व दाखविल्यावर मुलांनी स्वत: पोस्ट खातं चालवायचं.
- इतर विद्यार्थ्यांनी येऊन आपल्याला काय हवे ते घेऊन, लिहून पत्रपेटीत टाकायचं.
- मुलांनी ह्याचं नाटकच सादर करायचं.
- एखाद्या मुलाला पोस्टमन करून त्याने ती पत्रे ज्याची असतील त्यांना द्यायची.

हा खेळ खेळतांना पत्र व तार आपल्या पर्यंत कसे पोहचतात हेही सांगावं म्हणजे खेळाला आणखीनच रंगत येईल. अशा प्रकारच्या खेळातून मुलांना पोस्टाची सर्व माहिती मिळू शकते. आपण ही सर्व माहिती गोळा करावी किंवा मुलांनाच ती माहिती गोळा करायला सांगावी आणि नंतर त्याचं नाटक सादर करायचं. मुलांना नक्कीच आवडेल.


**खेळ** - मामाचं पत्र हरवलं हा खेळ घेऊन हे सत्र सुरू करता येईल.


# घड्याळ शिकविणे

सर्वच मुलांना घड्याळाचं खूप आकर्षण असतं व ह्या आकर्षणामुळे मुले खोटी घड्याळे मनगटाला बांधून 'घड्याळ - घड्याळ' ही खेळत असतात. काही वेळेस घरातील मोठ्यांची नजर चुकवून खरं घड्याळही हाताळण्याचा प्रयत्न करतात. कधी कधी खाऊच्या पैशातून स्वस्तातलं इलेक्ट्रॉनिकचं घड्याळ आणून वापरत असतात. ते घड्याळ समजायला खूप सोपं. वेळ आणि मिनिटं दोन्ही एकाचवेळी दिसत असतात. पण काट्यांच्या घड्याळांच काय ? सेकंद, मिनिटं, तास कळायला काट्याचंच घड्याळ उपयोगी पडतं. ते तर बहुतेक मुलांना कळतच नाही. मुलांसोबत घड्याळ्याचं सत्र घ्यावं हे आम्हाला अगदी प्रकर्षाने जाणवत होतं. त्याचं असं झालं, शाळेत बऱ्याच मुलांच्या हातात इलेक्ट्रॉनिकची घड्याळे असायची. वेळ विचारला की, तास आणि मिनिटे दोन्हीही सागंत होते. म्हणजे 'अकरा पंचावन्न झाले.' असं सागायची. त्यांना विचारलं 'तुम्हाला काट्यांचं घड्याळ समजतं का?' तर 'नाही'. पण पुस्तकात तो धडा आहे. म्हणून मग आम्ही ठरवलं की, मुलांना हे घड्याळ शिकवायचं. यासाठी आम्ही थर्माकोलवर काटे, आकडे लावून एक घड्याळ बनवलं. मुलांना विचारलं, 'हे घड्याळ आहे का ?' तर मुलांचे उत्तर 'नाही'. कारण?, "त्याचे काटे हाताने फिरवावे लागतात. खऱ्या घड्याळ्याचे काटे आपोआप फिरत असतात." मग घड्याळ्याचं चित्र फळ्यावर काढून किती वाजले हे विचारलं तर मुलांना सांगता आलं नाही. तेव्हा प्रत्येकाला जवळ बोलावून कोणता काटा कुठे आल्यावर किती वाजतात हे सांगण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी एक गाणेही लगेच रचून एक खेळही घेतला. मुलांना काट्याचं घड्याळ समजायला थोडं अवघडच आहे. म्हणून असं वाटलं की हे समजण्यासाठी त्यांना थोड्या गोष्टी अगोदरच माहीत असणे आवश्यक आहे. जसे पावगोल, अर्धगोल, पाऊणगोल, पूर्णगोल, घड्याळ्याच्या काट्यांची फिरण्याची दिशा ही नेहमीच डाव्या बाजूकडून उजवीकडे असते हे एकदा मुलांना समजलं की घड्याळ समजण्यास सोपं जाईल. यासाठी आपण खऱ्या घड्याळाचा उपयोग केला तर ते मुलांना चटकन समजेल.

उदा.

 पाव गोल

 पाऊण गोल

 अर्ध गोल


 पूर्ण गोल

**खेळ असा खेळायचा :**

- एखाद्या थर्माकोलवर घड्याळाचा आकार बनवून त्याला पुठ्ठ्याचे काटे लावून घड्याळ तयार करता येतं.
- किंवा भिंतीवरचं घड्याळ घेऊन मुलांना हे शिकवता येईल. खरंखुरं घड्याळ डोळ्यासमोर असल्यावर मुलांना ते चटकन समजेल.
- तासकाटा, मिनिटकाटा, सेकंदकाटा प्रत्यक्ष दाखवता येईल. मुलांना सांगतांना एखादं गाणं घेतलं तर मजाही येईल.

उदा. घड्याळ्यात वाजले बारा
बाबांचा चढला पारा
पारा उतरायला एक तास गेला
मी नाही अभ्यास केला.

- मुलांबरोबर घड्याळाचा खेळ ही खेळता येईल. मुलांनाच घड्याळाचे आकडे व काटे बनवले व त्यांना 'तासकाटा तीनवर आणि मिनिटकाटा बारावर आहे, किती वाजले सांगा पाहू' किंवा 'साडेसहा वाजलेत काटे कुठे कुठे असतील?' असे विचारूनही खेळता येईल.



मुलांना हे चांगल्याप्रकारे कसे समजेल ह्यासाठी वेळोवेळी प्रयत्न करायला हवेत.


# नकाशा वाचन

मुलांच्या भूगोलाच्या पुस्तकामध्ये नकाशे असतात व त्यामध्ये रस्ते, नद्या व इतर अनेक गोष्टी दाखविल्या जातात. या सर्व गोष्टी मुलांच्या लक्षात राहण्यासाठी आम्ही नकाशाचे जिग्सॉ तयार केले व ते मुलांना खेळायला दिले. असा खेळ मुले प्रथमच खेळत होती. म्हणून थोडी बुजली होती पण खेळता खेळता रमली व चांगली खेळू लागली. सगळे तुकडे व्यवस्थित जोडता यायला लागले. आमचा उद्देश हाच होता की, मुलांना कुठली राज्य कुठं आहेत हे व्यवस्थित समजावं.

**खेळ असा खेळायचा :**

- भारताचा, जिल्ह्याचा व तालुक्याचा असे तीन मोठे नकाशे घेऊन त्यांच्यामागे पुठ्ठा किंवा जाडसर कागद चिकटवायचा.
- नंतर प्रत्येक भागाचे व्यवस्थित तुकडे करायचे.
- तीन नकाशे ठेवण्यासाठी तीन वेगळ्या पिशव्या असाव्यात म्हणजे ज्याचे तुकडे त्यात व्यवस्थित राहू शकतील.
- आपल्याला जर नकाशा फाडावयाचा नसेल तर तो नकाशा एका मोठ्या कोऱ्या कागदावर ठेवून त्यावर टाचणीच्या सहाय्याने ठिपके कोरून तो छापून घ्यावा व छापलेल्या कागदावर नावं लिहून तो फाडावा.
- खेळ तयार झाल्यावर हे तुकडे मुलांच्या गटांमध्ये वाटावेत. साधारण तीन नकाशांसाठी तीन गट. तोपर्यंत दुसऱ्या मुलांना वेगळं काहीतरी करायला द्यावं.
- तुकडे वाटून झाल्यावर मुलांनी ते व्यवस्थित जोडण्याचा प्रयत्न करावा. सुरवातीला एक खेळ म्हणून ते खेळतील. पण या खेळातून आपण वेगळं काहीतरी शिकत आहोत याची जाणीव झाल्यावर आपोआपच मुलांचं अधिक लक्ष वेधलं जाऊ शकेल. कोणतं राज्य कोणत्या राज्याशेजारी आहे, किंवा तालुका, जिल्ह्यातील ठिकाणं यांची नावं व दिशा लक्षात राहू शकतील.
- नकाशा भिंतीला अडकवून त्याचं वाचन करण्यापेक्षा अशाप्रकारे केलेला अभ्यास मुलांच्या लक्षात राहण्यास सोपा आहे.
- तसंच वेगवेगळ्या शहरांची, नद्यांची माहिती मुलांना याद्वारे समजण्यास सोपी जाते. जिल्हा, तालुका, शहर यांची माहिती मुलांनी द्यावी. वेगवेगळ्या गावांहून मुलं येत असतील, तर आपल्या गावाची माहिती मुलांनी यामध्ये द्यावी.

काही वेगळी वैशिष्ट्ये असल्यास ती सांगावीत. यामध्ये आपल्याला मुलांना बोलण्यास उद्युक्त करावे लागेल. मुलांना प्रश्न विचारून ते उत्तरं देतील ह्याकडे लक्ष दिलं पाहिजे.







अशा प्रकारे नकाशाचे तुकडे करुन पुठ्ठ्यावर चिकटवणे.

# कविता - गोष्टी तयार करु या !

मुलांना गाणी - गोष्टी आवडतात. पण नेहमीच गाणी - गोष्टींचा साठा आपल्याकडे नसतो. आपण जर मुलांच्या मदतीनेचं कविता - गोष्टी केल्या तर ? मजाच येईल . शिवाय मुलांचा शब्दसंग्रह वाढेल. त्यांनाही आपण कविता - गोष्टी करू शकतो, याचा अभिमान वाटेल. विशेष म्हणजे यात सर्वांचा सहभाग वाढेल. आम्ही जेव्हां हे सत्र वर्गात मुलांसोबत घेतलं तेव्हां खूपच मजा आली होती. मुलांना काय करायचं हे अगोदर सांगितले पण थोडावेळ काय करायचं हे कळलंच नाही. थोडे सविस्तर सांगितल्यावर समजलं. मग त्यांनी साखळी गोष्ट तयार केली, कविताही केल्या. त्यासाठी त्यांना काही शब्द दिले होते व ते त्यांनी खूपच छान प्रकारे एकत्र गुंफले.

**मुलांनी तयार केलेल्या काही कविता-**

१) माझी सुंदर शाळा
त्यात शिकतो बाळा
त्याच्या घराला टाळा
रंग त्याचा काळा
घाली गळ्यात माळा.

२) मला शिकायची शाळा
माझे नाव आहे बाळा
माझ्या घराला नाही माळा
म्हणून पाणी टाळा
माझ्या शाळेचा रंग आहे काळा
म्हणून माझे नाव आहे बाळा.

३) माझी आवडती शाळा
तीला गुंफील्या मी माळा
एक मुलगा काळा
तो म्हणाला चल शाळा
एक होता बाळा
तो वाजवतो टाळा.

प्रत्येक मुलाची कल्पना शक्ति खूप वेगळी आहे. टाळा, माळा ह्या शब्दांना त्यांनी दिलेले अर्थही वेगवेगळे आहेत व समर्पकही. त्यामुळेच हे सत्र मुलांसोबत खूपच छान झाले. ही मुलं इतक्या छान कविता करू शकतात याची पुन्हा एकदा आम्हाला प्रचीती आली.

**हे अशा प्रकारे करता येईल :**

**कविता तयार करणे**

- मुलांना काही यमक जुळवणारे शब्द देणे किंवा त्यांनाच एक शब्द देऊन इतर शब्द शोधायला लावणे.

उदा. काळा, बाळा, फळा, माळा, टाळा इ.

अशा प्रकारचे शब्द देऊन ते वाक्यात गुंफुन कविता तयार करायची. प्रत्येकाची वेगळी कविता तयार करावची व ह्या तयार झालेल्या कवितांना चाली लावून त्या म्हणून घ्यायच्या.

**गोष्ट तयार करणे**


गोष्ट तयार करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याचा सामूहिक सहभाग असेल. यामध्ये गोष्टीचे पहिले वाक्य कोणत्याही विद्यार्थ्याने सांगायचे. त्याला जोडून दुसऱ्या विद्यार्थ्याने दुसरे वाक्य तयार करायचे असे करता - करता ती गोष्ट पूर्ण करायची.

आणखी एका प्रकारेही आपण गोष्ट तयार करु शकतो. यामध्ये विद्यार्थ्यांना एक विषय देऊन त्यांना गोष्ट लिहायला द्यायची. यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याचे वेगळे विचार असतील व एकाच वेळी आपल्या वर्गात जेवढे विद्यार्थी, तेवढ्या गोष्टी आपल्याकडे जमतील. ह्या सर्व गोष्टींचे संकलन करुन मग पुन्हा वर्गात मुलांनाच त्या सांगायला लावायच्या.

मुलांची कल्पनाशक्ती यामध्ये खुपच उस्त्फूर्तपणे काम करते. मुलांच्या ह्या गोष्टी परिकथेतल्या, राक्षसांच्या नसतात. तर यामध्ये सध्याचे वास्तव असते. ह्या मुलांच्या गोष्टींमध्ये माणूस, जंगल, शिकारी अशाप्रकारचे उल्लेख असतात. आपल्या जीवनाशी जवळच्या असणाऱ्या गोष्टींना जास्त महत्व दिले जाते.

आपण गोष्ट सांगतांना त्यामध्ये मुलांचाही सहभाग घेता येतो. गोष्टीमध्ये जर खुप पात्रे असतील तर प्रत्येक विद्यार्थ्याला एक एक पात्र बनवून गोष्ट पूर्ण करता येते.

तसेच गोष्ट सांगताना आवाजातील चढउतार, गंभीरता, इतर आवाज यांचा वापर केला तर गोष्ट खुपच परिणामकारक होऊन मुलांना आनंद देते.



# खेळातून आकार

पाठ्यपुस्तकांमधून भौमितिक रचना शिकवल्या जातात. ह्या रचनांची उजळणी करण्यासाठी आम्ही 'टॅनग्राम' नावाचं चिनी कोडं वापरलं. त्या कोड्याचा वापर करुन वेगवेगळे आकार बनतील अशी चित्रे तयार करुन त्याचे सत्र घेतले. मुलांना हा प्रकार नवीनच होता. प्रत्येकाने स्वत:साठी एक कोडं तयार केलं व ते ती खेळून बघत होती. बऱ्याच जणांनी स्वत:चं डोकं वापरुन नवनवीन गोष्टी बनवण्याचा प्रयत्नही केला होता व आता तर त्यांच्या प्रत्येकाच्या कंपासपेटीत हे कोडं असतं. मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव देणे आणि फावल्या वेळात मुलांनी त्याचा उपयोग करावा हा एक उद्देश त्यामागे होता.

काही प्रश्न विचारुन आपण मुलांना बोलतं करु शकतो.


उदा. - चौकोन म्हणजे काय ?
- कोन म्हणजे काय ?
- त्रिकोण म्हणजे काय ?
- कशाकशाला कोन असतात ?
- आपल्या वर्गात / घरात असलेले कोन शोधा.


याप्रमाणे थोडे मुलांशी बोलून मग खेळाला सुरवात करायची.


**खेळ असा खेळायचा :**

प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ पुट्ठा देऊन त्याचा एक चौरस आकार तयार करायचा नंतर त्यावर पुढीलप्रमाणे रेषा आखून त्याचे तुकडे करायचे व हे तुकडे जोडून वेगवेगळ्या आकृत्या तयार करायच्या. हे एकूण सात तुकडे आहेत. पुढे काही नमुने दिले आहेत. मुलांनी हे आकार तयार करुन कोडं सोडविण्याचा प्रयत्न करायचा आहे. यामधून मुलांच्या कल्पनाशक्तीलाही वाव मिळण्यासारखा आहे.

प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ स्वत:चं कोडं असल्यामुळे त्या विद्यार्थ्याला केव्हांही हे सोडविता येईल.







# मी कोण होणार ?

८ ते १० वर्षाच्या मुलांना तू मोठेपणी कोण होणार ? असं विचारलं की बहुतेक वेळा ती आपल्या पालकांकडून ऐकलेली उत्तरं सागंत असतात. आम्ही ज्यांच्यासोबत काम करत आहोत ती मुलं हा प्रश्न कसा हाताळतील हे पाहण्यासाठी आम्ही त्यांच्यासोबत अशाप्रकारचे सत्र घेण्याचे ठरवले.

पण जर थोड्या मोठ्या वयाच्या मुलांना हा प्रश्न विचारला तर त्यांच्याकडून खूप विविध प्रकारची उत्तरं ऐकायला येतात.

मुलांना गोलात बसवले व सांगितले की, तुम्ही मोठेपणी कोण होणार ? किंवा तुम्हाला काय बनायला आवडेल ते कृतीतून करायचे. बोलायचे नाही. तुमची कृती इतर मुलं ओळखतील. हे सत्र खूपच छान झालं. ह्या मुलांना शेतकरी, अंपायर, 'किन्नर', ड्रायव्हर, शिक्षक, नर्स असं व्हायचं आहे. आम्हाला असं आढळलं की ह्या मुलांना एवढ्याच गोष्टी पहायला मिळत आहेत. त्यामुळे त्यांना मोठेपणी असंच बनायचं असतं एवढच माहीत आहे. जर त्यांना वेगवेगळ्या गोष्टी पहायला मिळाल्या तर त्यांची विचार करण्याची क्षमताही वाढेल. खेळ कसा खेळायचा ते खालीलप्रमाणे -

- सर्व मुलांना गोलात बसवून त्यांना मी मोठं झाल्यावर कोण होणार याची कृती करुन दाखवायला सांगायचं, बोलायच नाही.
- प्रत्येकजण आपल्याला जमेल तशी कृती करणार. इतरांनी ती ओळखायची. मग त्या विद्यार्थ्याने 'आपल्याला काय वाटते ते सांगायचे.
- त्यावर चर्चा करायची.
- त्यासाठी किती काळ लागणार, किती श्रम घ्यावे लागणार, अभ्यासाची गरज किती हे सर्व मुद्दे शिक्षकाने मुलांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे मुलांना ती गोष्ट साध्य करण्यासाठी किती परिश्रमांची आवश्यकता आहे याची जाणीव होऊन त्या गोष्टीकडे स्वप्नाळूपणे न बघता, शक्य गोष्ट म्हणून बघितले जाईल.
- एखादं उदाहरण द्यावं म्हणजे मुलांच्या डोळ्यासमोर ते उभं राहतं.


# हे कसं ? ते कसं ? हे काय? ते काय ?

मुलांच्या बुद्धीला व सृजनशीलतेला वाव देण्यासाठी हे सत्र घेता येईल. हे सत्र आम्ही दोन भागात विभागले होते. पहिल्या भागात मुलांना आवडत्या वस्तूविषयी बोलायला सांगितले व दुसऱ्या भागात वस्तूंचा नेहमी होत असलेल्या उपयोगा व्यतिरिक्त दुसरा उपयोग करुन दाखवणे.

पहिल्या सत्रात मुलांना बाहेर जाऊन वस्तू आणायला लावली. यामध्ये पाने, फुले, दगड व न आणता येणाऱ्या वस्तूंचाही समावेश होता, म्हणजे चिमणी, केवडा इत्यादी बद्दल मुलांनी खूप छान, त्यांना जसं जमेल तसं सांगितले. पानांचा आकार, रंग, शिरा याबद्दल मुलं बोलत होती. तसेच त्यांचा निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोनही आम्हाला समजून घेता आला. निसर्गात वाढणाऱ्या या मुलांना निसर्गातील बदलाची जाणीव असते, जी सहसा इतरांना जाणवत नाही.

दुसऱ्या सत्रात काही वस्तू समोर ठेवल्या व त्याचा उपयोग वेगळ्या प्रकारे कसा होऊ शकतो हे कृतीने करायला लावले. अगोदर मुलं लाजत होती पण एकाने सुरुवात केल्यामुळे सगळ्यांनी येऊन वेगवेगळ्याप्रकारे कृती केली. एकाने कंपासपेटीचा उपयोग गाडी म्हणून केला, एकाने कंपासपेटीत दोरा अडकवून तिची वैदुणीची पेटी केली, एकाने खुर्चीत सर्व सामान टाकून गाडी तयार केली. मुलं खुष होती व आम्हालाही मुलांच्या कल्पकतेचं कौतुक वाटत होतं. ह्या दोन्ही सत्रांचा उद्देश मुलांना बोलतं करावं व त्यांच्या सृजनशीलतेला वाव द्यावा एवढाच होता.

खेळ कसे खेळायचे हे आपण बघू.




खेळ क्र. १

बाहेर जाऊन मुलांना आवडेल ती वस्तू त्यांना घेऊन यायला सांगणे. यामध्ये मुलांना ठराविक वेळ देणं गरजेचं आहे.

मुलांनी वस्तू आणल्यावर सर्वांना गोलाकार बसविणे. आपणही त्यांच्याबरोबर बसणे. इथे आपण वर्गात, पटांगणातही बसू शकतो.

आणलेल्या वस्तूकडे सर्वांनी बारकाईने बघायचे व आपल्याला ती वस्तू का आवडते ह्याचे वर्णन करायचे. ह्या खेळामध्ये शिक्षकांनीही सहभाग घेतला की मुलांना बोलायला आणखीनच हुरूप येईल. मुलांची निरीक्षण शक्ती व आवडत्या वस्तूबद्दल आपल्या भावना प्रगट करण्याची क्षमता वाढविण्यास हा खेळ मदत करील.



खेळ क्र. २

यामध्ये काही वस्तू समोर ठेवून त्याच्या सध्याच्या उपयोगापेक्षा निराळा उपयोग कसा करू शकू हे मुलांनी कृतीतून दाखवायचं. सर्वांनी गोलाकारच बसायचं हे मुलं एरवीही करत असतात. फक्त त्यांच्या विचारांना चालना देण्यासाठी असे खेळ आपण वर्गात घेऊ शकतो व मुलांचा आनंद वाढवू शकतो.

उदा. थाळी - थाळीचा उपयोग जेवणासाठी असतो परंतु ती उपडी करुन डफली होऊ शकते. चंद्र होऊ शकतो. (वस्तूंची संख्या मर्यादितच असावी. प्रत्येकाने वेगवेगळी कृती करावी ह्याकडे आपण लक्ष घ्यावे.)



# मैत्री निसर्गाशी

सहल म्हटलं की मुलांना खूप उत्साह वाटतो. ही सहल नेहमी लांबचीच असली पाहिजे असं नाही. आपण आपल्या जवळची कित्येक ठिकाणं पाहिलेली, अनुभवलेली नसतात. आपल्याकडे एक म्हण प्रचलित आहे, 'काखेत कळसा, गावाला वळसा'. आपल्या आजूबाजूच्या गोष्टीतही किती सौंदर्य आहे याची जाणीव जर मुलांना झाली तर मुलांना आनंद होईल, मुलांमध्ये निसर्गप्रेम वाढीस लागेल.


आम्ही दोन्ही ठिकाणी परिसर सहल काढली. एका शाळेतील मुलांना धरणावर घेऊन गेलो तर दुसऱ्या शाळेतील मुलांना त्यांच्या शेजारच्या पाड्यावर असलेल्या पुरातन मंदिरात घेऊन गेलो. दोन्ही ठिकाणी मुलांनी मनसोक्त आनंद लुटला. तसे याठिकाणी ही मुलं नेहमीच येत होती. परंतु आजचं येणं खूपच वेगळं होतं. सर्व मुलं-मुली एकत्र येऊन गाणी म्हणत आनंद व्यक्त करत होती. त्याच्यामधे शिक्षकही सहभागी झाले होते.

सहल करुन आल्यावर मुलांना आम्ही चित्र काढायला सांगितलं व त्यांनी ती खूपच छान प्रकारे काढली होती. त्यांच्या अभिव्यक्तीला वाव देण्यासाठी आम्ही असे प्रयत्न बारंवार करत होतो.

फिरता फिरता मुलांना वेगवेगळ्या आकाराचे दगड, गोटे गोळा करायला प्रोत्साहन दिले. वेगवेगळी पाने, फुले, पिसे मिळाल्यासही मुलांना त्याचा संग्रह करण्यास सांगावे म्हणजे आपोआपच मुलांमध्ये निरीक्षण करण्याची वृत्ती तयार होईल.

**हे अशाप्रकारे करता येईल :**

- परिसर सहल करुन आल्यावर 'काय काय पाहिलंत' ह्याबद्दल मुलांना लिहायला सांगावे, चित्र काढायला सांगावे. त्यामध्ये जास्त जिवंतपणा येईल.
- आपल्या भागातच जर एखादी ऐतिहासिक जागा, पुराण वास्तु, मंदिर, संग्रहालय असेल तर त्याची माहितीही मुलांना याद्वारे मिळते किंवा त्यांनाच ती मिळवायला सांगून ती लिहून ठेवावी.
- या प्रत्येक गोष्टीकडे चिकित्सक नजरेने पहायला मुलांना उद्युक्त केल्यास त्याचा योग्य तो परिणाम मुलांवर दिसून येईल.



# भेंड्या खेळूया शब्दांच्या !

मुलांसोबतचं हे सत्र खूपच छान झालं होतं. वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या वर्गांवर वेगवेगळ्या पद्धतीने हे सत्र घेतले होते. ह्या सत्राचा उद्देश होता की मुलांचा शब्दसंग्रह वाढावा, त्यांना नवीन नवीन शब्दांची माहिती व्हावी. फक्त मराठीच नव्हे तर इंग्रजीचीही माहिती व्हावी हा उद्देश होता व तो सफल झाला असं आम्हाला वाटतं. यामध्ये शिक्षकांनीही सहभाग घेतला होता. वेगवेगळे शब्द शोधून काढल्यावर मुलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. इंग्रजी चित्र शब्द कोड्यात मुलांना काही चित्रांची नावं मराठीत माहित होती पण इंग्रजीत नव्हती. त्यांना ती सांगितली तेव्हां त्यांच्या उच्चारावरुन मुलांनी त्याचे स्पेलिंग शोधण्याचा प्रयत्न केला व ते त्यांना जमलेही. म्हणूनच शब्द संग्रह वाढविण्यासाठी हा खेळ खूपच उपयोगी आहे. भाषेबरोबरच (मराठी, हिंदी, इंग्रजी), जर विज्ञान, भूगोल, इतिहास अशा विषयांचे शब्दकोडे तयार केले तर मुलांना खेळाबरोबरच अभ्यासही करता येईल. किंबहुना अभ्यासाबरोबरच खेळताही येईल व अभ्यासाचा ताण आपोआपच कमी होईल.

शब्दकोड्याबरोबरच शब्दचित्रकोडेही मजेशीर आहे. चित्र पाहून मुलांनी शब्द तयार करायचा त्यामुळे ते आणखीनच सोपे होऊन खेळाला गंमत येते. हे कोडे जर इंग्रजीत केले तर मुलांना नव-नवीन नावं लक्षात राहण्यास मदत होईल. दोन गटांमध्ये भेंड्या लावल्या तर खूपच मजा येते. गावांच्या, शहरांच्या, नावांच्या, पाढ्यांच्या, कवितांच्या ही भेंड्या लावून पाठांतर करता येते.

**खेळ अशा खेळता येईल :**


- शब्दकोडी मोठ्या कागदावर लिहून ठेवावीत. म्हणजे ती केव्हांही वापरता येतात.
- मुलांना ४-४, ५-५ च्या गटात बसवून ती शब्दकोडी सोडवायला द्यायची.
- जेवढे गट तेवढी शब्द कोडी तयार असावीत.
- मुलांनी ती आपल्या वह्यामध्ये सोडवावीत. म्हणजे प्रत्येकाने किती सोडवलं व बरोबर सोडवलं का? हे पाहता येईल.
- अशाच प्रकारे भेंड्याही घेता येतील. एक दिवस शब्दकोडे व एक दिवस भेंड्या असंही करता येईल.

१) भारतातील राज्यांच्या राजधान्या ओळखा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| चं | दि | ग | ढ | न | ज | सि | अ |
| क | बं | ट | है | य | ध | म | क |
| ड | फ | ग | पू | द्रा | र | ला | भु |
| ल | ना | र | लो | फा | बा | व | त्रि |
| जो | ख | वा | स्व | ट | ने | द | वें |
| ह | मुं | नौ | पै | श्र | का | ल | द्र |
| रा | क | ब | र | प | ण | जी | म |
| ट | ठ | ध | ई | ध | न | बा | द |
| म | शि | प | र | य | ण | त | व |

२) चित्रांवरुन शब्द शोधा. सापडतात का पहा बरं !

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| B | B | C | E | N | F | A | N |
| M | A | N | G | O | I | U | N |
| T | B | T | G | O | S | E | E |
| A | Y | U | P | M | H | S | G |
| R | M | L | I | O | N | U | N |
| K | E | Y | U | R | T | O | A |
| I | T | S | R | U | O | H | R |
| T | E | G | I | R | L | N | O |



# सामूहिक वर्तमानपत्र वाचन

बाहेर कुठेही वर्तमानपत्राचा तुकडा मिळाला की ही मुलं तो घेऊन वाचत असायची असं आमच्या नेहमीच पहाण्यात यायचं. खरं तर शाळेत वर्तमानपत्र येत असे (कधीकधी) परंतु मुलांना वाचायला मिळत नसे. त्यांनी वर्तमानपत्र वाचावं असं आम्हालाही नेहमीच वाटायचं म्हणून त्यांच्यासाठी वर्तमानपत्र वाचायचं असं एक सत्रच तयार केलं. त्यामधे मुलांनी वर्तमानपत्र वाचायचं, त्यातील आवडलेली बातमी कापायची व त्यातून त्यांनी पुन्हा वर्तमानपत्र तयार करायचं. हे सत्र आम्ही मुलांचे गट करून घेतलं. त्यातील ज्यांना वाचता येत नव्हतं त्यांना चित्र कापायला लावली. मुलांच्या आवडलेल्या बातम्यांमध्ये स्त्रियांवर असणाऱ्या बातम्या, चित्रपटाच्या जाहिराती, कोडी व चित्रं होती व त्या सर्वांचं मिळून मुलांनी वर्तमानपत्र तयार केलं. मुलांना हा अनुभव खूपच नवीन होता व आनंददायक होता. मनसोक्त वाचन करायला मिळाल्यामुळे मुले खूपच खूष होती. त्यानंतर मुलांसोबत थोडक्यात चर्चाही घेतली.

हे सत्र घेतांना काही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवणे गरजेचे आहे. एक म्हणजे मुलांमध्ये वर्तमानपत्र वाचनाची आवड निर्माण होणे व दुसरे मुलांना नवनविन गोष्टींची माहितीही होईल.

**खेळ असा खेळायचा :**

- मुलांना गटांमध्ये बसवावे.
- प्रत्येक गटात वर्तमानपत्र वाटून द्यावी.
- अगोदर पूर्ण वर्तमानपत्र वाचायला सांगावे.
- नंतर गटामध्ये विषय देऊन (उदा. पर्यावरण, आरोग्य, राजकारण) त्याप्रमाणे बातम्या निवडायला लावावे.
- निवडलेल्या बातम्या एकत्र करून आपआपल्या गटाचे वेगळे वर्तमानपत्र तयार करावे.
- लिखाणाबरोबरच चित्रेही कापून लावावीत. म्हणजे वर्तमानपत्र अधिकच आकर्षक होईल.
- हे सर्व झाल्यावर मुलांशी चर्चा करावी.

**काही प्रश्न -**

- बातम्या कोणकोणत्या होत्या ?
- किती बातम्या महत्वाच्या होत्या ?
- कोणत्या विषयवरील बातम्या वाचायला तुम्हाला अधिक आवडले ?
- मुलांवरील बातम्या किती होत्या ?
- हे करतांना काय वाटलं ?

**टीप :**

वाचनाची आवड ही फक्त ह्या सत्रापुरतीच मर्यादित न ठेवता त्यांच्यासाठी छोटसं ग्रंथालयही तयार करता येण्यासारखे आहे. म्हणजे मुलांची वाचनाची आवड कायम राहील.

**संग्रहासाठी पुस्तके :**

- अनौपचारिक शिक्षण साधन केंद्र (महाराष्ट्र), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, जे.पी. नाईक पथ, १२८/२, कोथरुड, पुणे - ४११ ०२९.
- नेहरु बाल पुस्तकालय - संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-५, ग्रीन पार्क, नवी दिल्ली - ११० ०१६.



# कालजी खाण्याची

आम्ही शाळांमध्ये पोहचायचो तेव्हां मुलांची जेवणाची वेळ झालेली असायची मुलं खूपच आग्रहानं जेवायलाही बोलवायची. जेवणामध्ये नेहमी भात-डाळ असंच असायचे. क्वचित पालेभाजी व मटणही असायचे. ही मुलं घरी काय जेवत असतील बरं ही उत्सुकताही आमच्या मनात होती. शिवाय त्यांच्या पुस्तकात संतुलित आहार नावाचा धडाही होता. मग असं ठरवलं की, ह्या धड्यावर आपण एक सत्र घेऊ. त्यासाठी वेगवेगळी जीवनसत्वे असलेली फळभाज्या, पालेभाज्या, मसाले, स्निग्धपदार्थ, धान्ये अशाप्रकारे वर्गीकरण करुन कार्ड चित्रे बनविली. मुलांसमोर एका खेळाने ह्याचे महत्व सांगण्याचे ठरले. आमच्या मध्ये एक आहार तज्ञ आहेत त्यांना घेऊन आम्ही वर्गावर गेलो. मुलांसोबत खूप गप्पा मारल्या. त्यांना गोष्टही सांगितली व खेळाला सुरवात केली. मुलांना विचारलं जेवणामध्ये काय काय असतं, शाळेत व घरीही. घरीच चांगलं जेवण असतं असं मुलांच्या हावभावावरुन व बोलण्यावरुन कळत होतं. घरच्या जेवणाची चव त्यांच्या जिभेवर रेंगाळत होती. शाळेच्या जेवणांत काय काय असावं ह्या विषयीही ती बोलत होती. शेवटी शाळेत परसबाग तयार करून त्यात भाज्या लावता येतील व त्याचा उपयोग जेवणात होईल इतपत मुलांनी विचार केला व त्याची जबाबदारीही घ्यायचं ठरवलं.

खेळासाठी लागणारं साहित्य -

- दोरी बंडल
- अन्न पदार्थांची नावे व चित्रे असलेली कार्डे


**खेळ असा खेळायचा :**

- जेवढे तक्ते असतील त्या प्रमाणात मुलांचे गट करायचे.
- निरनिराळ्या अन्नगटांचे तक्ते मुलांच्या गटांमध्ये वाटायचे.
- जेवणात सर्वात जास्त काय असतं हे विचारुन दोरीचे टोक त्या गटाकडे द्यायचे. उदा. भात असेल तर तेथून खेळाला सुरूवात करायची.
- अशा प्रकारे मुलांना विचारुन दोरीचे बंडल पुढे पुढे सरकवायचे.
- 'कोळ्याची जाळी' तयार होईल.
- दोरी ज्या कार्डाकडे गेली नाही तो पदार्थ आपण खात नाही, हे लक्षात आणून द्यायचे व त्याचे महत्व ही मुलांना सांगायचे.


फळभाज्या


पालेभाज्या


तेल, तूप, लोणी


फळे


मसाले
मीठ


दूध, दही, ताक


गूळ/साखर


कंदमुळे


मांसाहारी पदार्थ


धान्य


कडधान्य


डाळी
तुर, मुग, उडिद,
मसूर, हरबरा

**गोष्ट - विसराळू विनू (थोडक्यात)**

विनू खूप विसरभोळा. त्याला शाळेच्या परसबागेत भाजी लावायची असते. हा विनू सर्व तयारी करतो. रोज बागेत पाणी घालतो. सर्वांच्या वाफ्यात हिरवे कोंब दिसू लागतात. पण विनूचा वाफा तसाच! विनू बरेच दिवस वाट पाहतो. पण गवताशिवाय काही उगवतच नाही. नंतर त्याच्या लक्षात येतं की, आपण बिया पेरायलाच विसरलो. ( गोष्ट सांगतांना वाढवून सांगावी.)

गोष्ट सांगून मुलांना परसबाग तयार करायला उद्युक्त करु शकतो. ह्यामध्ये मुलांनाच त्यांच्या आहारातील महत्वाचा घटक विचारून त्यानंतर ते जे अन्नघटक खातात त्याप्रमाणे तो खेळ पुढे जाईल व जे घटक त्यांच्या खाण्यात नसतील त्यावर चर्चा करता येईल.

एखादं गाणंही घेऊ शकतो. स्वत: गाणं रचून मुलांना आहाराविषयी / जीवनसत्वाची माहिती देता येईल.

संदर्भ - 'जाऊ आरोग्याच्या गावा',

मोहन देशपांडे, एफ.आर.सी.एच., ६४/५, आनंद पार्क, बाणेर रोड, औंध, पुणे - ४११ ००७.



**शेपटीवाल्या दाण्यांची सभा**

चाल - शेपटीवाल्या प्राण्यांची...

शेपटीवाल्या दाण्यांची
एकदा भरली सभा !
शेंगदाणा सभापती
मधोमध उभा
शेंगदाणा म्हणाला
"मित्रांनो गंमत पहा किती
तुम्हा आम्हा सर्वांना एकेक शेपटी
या शेपटीचे कराल काय ?
नटकी, मटकी लाजत उठली
लाजत लाजत हळूच म्हणाली
'शेपटीसंगे जमिनीत जाईन
वाढून खूप खूप दाणे देईन'
फुगवून छाती चवळी आली
दणकट आवाजात बोलू लागली
"शेपटीत माझ्या केवढी शक्ती
म्हणूनच वेल जाईल वरती !"
तोल सांभाळत
गोलमटोल वाटाणा उठला
बोलताना त्याला घामच फुटला,
"शेपूट म्हणजे माझे पाय
म्हणून तर मी उभा हाय..."
हिरवा कोट सांभाळत
मूगबुवा उठले हातवारे करीत
रुबाबात बोलले,
'अस्सा पसरीन, अस्सा पसरीन
मीही माझ्या शेपटीने
आडवा वाढीन,तिडवा वाढीन'
मसूर म्हणाली,
नाही ग बाई, तुमच्यासारखे
माझे मुळीच नाही
दिसले जरी मी अश्शी बारकी
ताकद माझी मात्र तुमच्यासारखी
पाणी पिवून मी खूपखूप फुगेन
शेपूट फुटल्यावर जमिनीत रुजेन
मग होतील माझे हजार दाणे
आणि मुलांना मिळतील प्रथिने
सारे ओरडले, "नक्को ! नक्को !
माणसांशी नातं मुळीच नको !!
माणूस तर पक्का आप्पलपोटी
गाजवू पहातो सत्ता मोठी !"
मसूर म्हणाली, ऐका जरा
ऐकून त्यावर विचार करा
तुम्ही इथे आलात कुठून ?
आम्ही आलो शेतामधून
शेत तुमचे नांगरले कोणी ?
शेतात बीया पेरल्या कोणी ?
तुम्हाला पाणी दिले कोणी ?
वाढायला खत घातले कोणी ?
तुमची रोपं राखली कोणी ?
प्रश्न ऐकून सगळे चिडीचूप
तोंडाला जणू लागलं कुलूप !
शेंगदाणा म्हणाला, शेंगदाणा म्हणाला
खरंय चिमुरडे तुझं म्हणणं
तुझ्या बोलांनी केलंस शहाणं !
आपण अवलंबून माणसांवर
माणसं अवलंबून आपल्यावर
शिकवण मनी ठेवू जागी
खेळीमेळीने वागू जगी !...."

- अरुणा, जुनुका

# झाडांची किमया

एकतरी झाड लावू या रे
रंगीत रंगीत फुला फळांनी
परिसर आपुला सजवू या
एक तरी झाड लावू या रे ॥धृ॥
खेळून खेळून थकतो आपण
उन्हात येतो घाम
थंड सावली उभे राहता
किती मिळे आराम
बीज - बीज सांभाळूया रे
एक तरी झाड लावू या ॥१॥

पर्यावरणातील अविभाज्य घटक म्हणजे झाडं. हे सर्वांनाच माहीत असतं. म्हणून आम्ही मुलांसोबत पर्यावरणावर आधारित सत्र घेण्याचे ठरवले. यामधे मुलांना माहीत असलेल्या झाडांची नावं विचारली. आम्हाला वाटलं मुलांना थोड्याच झाडांची नाव माहीत असतील. पण तो आमचा भ्रम होता. त्यांच्याकडून कमीतकमी शंभर ते सव्वाशे झाडांची नावं आली. तसेच त्यांचा उपयोग ही मुलांनी सांगायला सुरूवात केली. नेहमीच्या वापरातील झाडं असल्यामुळे त्यांना औषधी गुणही माहीत होता. इयत्ता चौथीच्या मुलांना थोडी वेगळ्याप्रकारे माहिती सांगितली म्हणजे झाड वाढतं कसं, त्यांची मुळं कशी असतात, त्यांचं खाणं याविषयी. मुलांनी झाडं सांभाळावीत म्हणून त्यांना एक छोटी गोष्ट सांगितली. (चिपको आंदोलनाच्या सुरवातीची) इयत्ता सहावीच्या वर्गावर हे सत्र आणखी वेगळ्याप्रकारे घेतलं. नेहमी आपण ज्या परिसरात वावरतो त्याची आपल्याला कितपत माहिती आहे हे जाणून घेण्यासाठी एक खेळही घेतला. तो होता स्पर्शाचा. खेळून आल्यावर त्यांच्याशी चर्चा घेतली. प्रत्येकाचा अनुभव खूप नवीन व वेगळा होता. या तीनही वर्गातील सत्राचा समारोप आम्ही वृक्षारोपणाने केला. हा कार्यक्रम सर्व शाळेसाठी घेण्यात आला होता. शिक्षक-मुख्याध्यापकही या कार्यक्रमात सहभागी होऊन आनंद उपभोगत होते.

**खेळ असा खेळायचा :**

- मुलांना बाहेर फिरायला घेऊन जावं,
- फिरता फिरता त्यांच्याशी गप्पाही माराव्या.
- बाहेरच एखाद्या झाडाखाली बसून त्यांच्याशी झाडांविषयी गप्पा माराव्या.

- एखादं गवत मुळासह उपटून त्यांना मुळांची माहिती द्यावी. झाड कसं वाढतं यावर बोलायचं. त्यानंतर मुलांना त्यांच्या भागात असणाऱ्या झाडांची नावं विचारायची. झाडांपासून आपल्याला काय काय मिळते ? ह्यातील कोणकोणत्या वनस्पतींचा तुम्ही औषध म्हणून उपयोग करता ? नेहमी झाडपाल्यावर अवलंबून राहता की, डॉक्टरांकडे जाता ? कोणत्या आजारांसाठी डॉक्टरांकडे जाता? जंगलतोड होते का ? कोणत्या प्रकारची झाडे तोडली जातात ? तुम्ही लाकूडफाटा आणता तो ओला असतो की सुका? एक झाड तोडल्यावर दुसरं नवीन झाड लावता का ? चिपको आंदोलनाची गोष्ट सांगून आपणही आपल्या भागात झाडं वाचवू शकतो हे सांगायचं. शाळेमध्ये वृक्षारोपण करून प्रत्येकाने आपले झाड सांभाळावं. झाडांची माहिती सांगतांना वेली, झुडूप, काटेरी वनस्पती इत्यादी झाडांचाही समावेश असावा.

**खेळ - स्पर्शाने वस्तू ओळखणे.**

मुलांना बाहेर घेऊन जाऊन त्यांच्या दोन-दोनच्या जोड्या करणे. त्यातील एकाला डोळे बंद करायला लावून दुसऱ्याने त्याचा हात धरुन त्याला परिसर फिरवून आणायचा. असं दोघांनीही आलटून पालटून करायचे. सर्वांचा खेळ खेळून झाल्यावर मुलांशी चर्चा करणे.

- खेळ कसा वाटला ? भीती वाटली का ? 'हो' तर का ? 'नाही' तर का ? काय काय पाहिलं ? अनुभवलं - कोणकोणते आवाज ऐकले ? डोळे बंद होते तर कसं वाटलं ? डोळे उघडे असते तर कसं वाटलं असतं ? ह्या सगळ्या उत्तरांची सांगड पर्यावरणाशी घालण्याचा प्रयत्न करणे.

झाडांचा संदर्भ असणारी पुस्तके व प्रकाशने -

१) अवती भवती - शरद चाफेकर/विलास चाफेकर, रानवारा प्रकाशन, क्यू ३४, इंद्रनगरी, डहाणूकर, कोथरुड, पुणे - ४११ ०२९.

२) झाडांचं देणं - अरुण निकम, शितल प्रकाशन, गजानन कन्स्ट्रक्शन्स, भडगावरोड, चाळीसगाव, जि. जळगांव.

३) आपली वनराई - भाग १-२, शैलजा ग्रब, संपादक/प्रकाशक, डॉ.चित्रा नाईक, मानद संचालक, अनौपचारिक शिक्षण साधन केंद्र महाराष्ट्र, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे - ४११ ०२९.

४) निसर्ग परिचय - प्रमुख भारतीय वृक्ष, पिप्पा मुखर्जी, प्रकाशक - रवी दयाल, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, २/११ अन्सारी रोड,दर्यागंज, नवी दिल्ली - ११० ००२.

# पावसाळा व इंद्रधनुष्य


आम्ही जेव्हां हे सत्र मुलांसोबत घेतलं तेव्हां श्रावण महिना होता, त्यामुळे मुलांना एकाचवेळी पाऊस व इंद्रधनुष्य दोन्हीची मजा पहायला मिळाली. पाऊस कसा पडतो हे मुलांना अगोदरच माहीत होतं. म्हणून पाऊस व शेती यांची सांगड घालण्यासाठी त्यांना काही शेतीविषयक प्रश्न विचारले व त्यांची उत्तरे त्यांच्याकडूनच काढली. मुलांना शेतीचे ज्ञान खूप आहे. शेतकऱ्यांचीच मुलं असल्यामुळे शेतीविषयी खूप बोलत होती. इंद्रधनुष्याचे रंग त्यांना माहित नव्हते म्हणून त्यांच्यासाठी एक सूत्र सांगितलं. 'जां तां ना हि पा नी पि.' मुलांनी लगेच आपल्या वह्यांमध्ये हे टिपून घेतले. ह्याचे रंग या क्रमात नाहीत पण लक्षात राहण्यासाठी त्यांची मांडणी अशाप्रकारे केली होती. इंद्रधनुष्य कसं पडतं ? त्यांना माहीत नव्हतं. मग त्याना त्याविषयी थोडी माहिती दिली. पट्टीच्या पारदर्शाचा उपयोग करुन इंद्रधनुष्याचे रंग दाखवले. पाऊसकाळाची आणखी मजा येण्यासाठी त्यांना एक मजेशीर गाणंही शिकवलं. (गार गार वारा, पावसाच्या धारा)

**हे सत्र अशाप्रकारे घेता येईल -**

- पावसाळ्यातील महिने कोणते ?
- पाऊस काळात काय काय घडतं ?
- कोणती पिके घेतली जातात ?
- पावसाळ्यात तुमच्या भागात कोणती पिके घेतात ?
- काय काय केल्यावर आपल्याला धान्य मिळतं ?
- पावसाळ्यात आकाश कसं दिसतं ?
- आकाशात इंद्रधनुष्य तुम्ही पाहिलं आहे का ?
- इंद्रधनुष्याचे रंग किती ? (ते लक्षात राहण्यासाठी एक सूत्र - जा ता ना हि पा नि पि
जांभळा, तांबडा, नारंगी, हिरवा, पारवा, निळा, पिवळा. हे रंग याक्रमाने नाहीत. रंग लक्षात राहण्यासाठी हे सूत्र तयार केले आहे.)
- ते कसं पडतं ? याची माहिती देणे.
- प्रिझमद्वारेही (त्रिचिती) सांगता येईल.
- एखादं रंगाचं गाणंही घेता येईल.
- बालकवींची 'श्रावण मासी हर्षमानसी' कविता चाल लावून म्हणता येईल.

**'मजा रंगाची'**

तां ना पि हि नि पा जां
सात रंगाची खाशी मजा
हो खाशी मजा
हो खाशी मजा
तांबडा नारंगी अन् पिवळा
हिरवा निळा पांढरा जांभळा
तां ना पि हि नि पां जां
सात रंगाची खाशी मजा
हो खाशी मजा
हो खाशी मजा
झुंजुमुंजु होता तांबड फुटलं
नारंगी रंगाचं मोहळ उठलं
मोहळानं टाकलं पिवळं पिवळं ऊन
हिरवगार शेत डोलतंय झेलून
शेतातून उडाले पारवे पक्षी
निळ्या आभाळी काढीत नक्षी
नक्षीत भरला रंग जांभळा
आभाळीचा चित्रहार उंच उंच टांगला
(संदर्भ - विज्ञान पत्रिका)



# जाणीव सामाजिक स्वास्थ्याची

स्वास्थ्य (आरोग्य) म्हटलं की आपण फक्त आपले वैयक्तिक आरोग्य याकडे लक्ष देत असतो. पण आपण सामाजिक स्वास्थ, पर्यावरण याकडेही लक्ष द्यायला नको का? त्यामुळेच आपल्याला अनेक परिणामांना तोंड द्यावे लागत आहे. म्हणूनच ह्या सत्राची सुरुवात आम्ही वैयक्तिक स्वास्थ्य (आरोग्य) यापासून केली होती. हात, पाय स्वच्छ ठेवणे, रोज अंघोळ करणे, कपडे व्यवस्थित धुणे हे किती महत्वाचे आहे या विषयीचे सत्र घेतले. आमच्या असं पाहण्यात आलं होतं की या मुलांमध्ये खरुज व उवांचं प्रमाण जास्त आहे. त्यासाठी वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच सामूहिक स्वच्छताही आवश्यक आहे. आजार होण्या अगोदरच जर प्रतिबंधात्मक उपाय केले तर त्याचा फायदा सर्वांसाठीच होणारा आहे. म्हणून त्यांच्यासाठी 'सामाजिक स्वास्थ्य' यावर एक सत्र घेतलं. त्यामधे पर्यावरण व आरोग्य यांची सांगड घालून मुलांना सामाजिक स्वास्थ्याचे महत्व सांगण्याचा प्रयत्न केला होता. यासाठी मुलांना आरोग्यावर परिणाम करणाऱ्या पर्यावरणातील घटकांचे विषय देऊन त्यावर चित्रे काढायला सांगितले व त्यावर चर्चा घेतली.

**हे सत्र अशाप्रकारे घेता येईल -**

१) मुलांना गोलात बसवून त्यांच्याशी गप्पा मारायच्या

२) मुलांना काही चित्रे काढायला द्यायची.

३) त्यामध्ये ग्रामीण भागातील जीवन, शहरातील जीवन, कारखाने, रहदारी, नदीच्या पाण्याचा उपयोग असे विषय देऊन चित्र काढायला सांगायचे.

४) नंतर ही चित्र भिंतील लावून त्यावर मुलांशी चर्चा करायची.

५) सामाजिक स्वास्थ्याची चर्चा होईल असे मुद्दे हाताळण्याचा प्रयत्न करायचा. त्याचे फायदे, तोटे काय आहेत हे मुलांना नीट समजावून सांगावेत.

६) नंतर स्वास्थ्य विषय घेऊन मुलांशी चर्चा करावी.

७) कचऱ्याची विल्हेवाट कशी लावावी, वर्गाची, आसपासची स्वच्छता का करावी, शौचास जाऊन आल्यावर हात साबणाने का स्वच्छ धुवावेत, अशाप्रकारे मुलांना थोडी माहिती द्यायची.

८) काही प्रात्यक्षिके करून, गोष्टी, गाणी सांगून ही जाणीव जागृती मुलांमध्ये करता येईल.

९) खत खड्डा, शोषखड्डा यांचे प्रात्यक्षिक करुन दाखवता येईल. त्याचा उपयोग मुलांना सांगता येईल.

१०) काही गाणी, गोष्टी स्वतः तयार करूनही मुलांना सांगता येईल.

११) शाळेमध्ये आरोग्य जत्रा ही भरविता येईल. (सत्र २१)

**सामाजिक स्वास्थ - ओवी**

पहिली माझी ओवी गं
करिन स्वच्छता वर्गात गं
वर्गामधला केर कधीही
नाही ढकलणार परसात गं ॥ १ ॥





दुसरी माझी ओवी रे
खत खड्डा करीन रे
परसामधला केरकचरा
टाकीत जाईन त्याच्यात रे ॥ २ ॥



तिसरी माझी ओवी गं
अंघोळ स्वच्छ करीन गं
सांडपाण्यासाठी बाई
शोषखड्डा करीन गं ॥ ३ ॥

चौथी माझी ओवी रे
झाडे लावीन परसात रे
शोषखड्यामधलं पाणी
मिळेल वेलीस रे ॥ ४ ॥



पाचवी माझी ओवी गं
कपडे धुण्या जाईन गं
नदीमध्ये कपडे कधीही
नाही धुणार मी बाई गं ॥ ५ ॥



सहावी माझी ओवी रे
गावाबाहेर जाईन रे
परसाकड झाल्यावर दादा
माती ढकलीन त्यावर रे ॥ ६ ॥



सातवी माझी ओवी गं
जनावरं दूर ठेविन गं
स्वच्छ करण्या त्यांना बाई
नाही नेणार नदीवर गं ॥ ७ ॥




आठवी माझी ओवी रे
स्वच्छ पाणी भरीन रे
आजाराला दूर पळविण्या
पाणी घेईन गाळून रे ॥ ८ ॥



नववी माझी ओवी गं
गाव जागा झाला गं
चढाओढीने सगळ्यांनी गं
गाव स्वच्छ केला गं ॥ ९ ॥

वंदना पटेकर

# येथून पुढील सत्रे सामुहिकरित्या घेण्यासाठी उपयुक्त आहेत.



# हे दिवस लक्षात ठेऊ या !

शाळांमधून काही ठराविक दिन साजरे केले जातात. उदा. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १४ नोव्हेंबर, तसेच जयंती व पुण्यतिथी साजरी केली जाते, पण अजूनही असे काही दिवस आहेत, ज्यांची माहिती मुलांना होणे आवश्यक आहे.

उदा. क्रांती दिन, पर्यावरण दिन, महिला दिन अशा दिनांची माहिती ही मुलांपर्यंत पोहचवावी असे वाटते. काही माहिती सहज उपलब्ध होऊ शकेल, तर काहीसाठी थोडा कष्ट घ्यावे लागतील. पण एकदा का असे दिन मुलांसोबत साजरे करायला लागलो की मुलांना व आपल्यालाही ह्याची गोडी लागेल.

आम्ही मुलांसाबेत क्रांतीदिन, महिला दिन साजरे केले होते. मुलांचा उत्साह खूपच होता. त्यामध्ये शिक्षकही सहभागी झाले होते. शाळांमध्ये हे दिवस साजरे होत नसल्याने त्यामध्ये नाविन्य होते व मुलांना माहितीही मिळत होती.

उदाहरण :

१) क्रांती दिन - ९ ऑगस्ट

- 'चले जाव' चळवळीची माहिती द्यावी.
- मुलांनाच ह्या क्रांतीविषयी बोलायला सांगावे. त्यांना काय माहीत आहे हे जाणून घ्यावे.
- राजकीय लढ्यात कोणी कोणी भाग घेतला त्यांची नावं विचारावी.
- राजकीय लढ्यात (स्वातंत्र्य मिळविण्यात) मुलांचाही पुढाकार होता हे दाखविण्यासाठी 'शिरिष कुमार' ची गोष्ट सांगावी.
- स्वातंत्र्य लढ्याचं एखादं गाणं घ्यावं.
- रष्ट्रगीत कसे तयार झाले याबद्दल सांगावे.
- राष्ट्रगीताला का मान देतात हेही सांगावे.

२) महिला दिन - ८ मार्च

- भारतातील व जमल्यास देशभरातील नावाजलेल्या महिलांची व त्यांच्या कार्यांची ओळख/माहिती द्यावी.
- महिलांच्या अधिकारांची माहिती द्यावी.
- स्त्री-पुरुष भेदभाव टाळावा याची माहिती विद्यार्थ्यांना समजेल अशा सोप्या भाषेत सांगावी.
- वर्तमानपत्रात आलेली माहिती वाचून दाखवावी.

काही महत्वाचे दिन पुढीलप्रमाणे :-

१२ जानेवारी - युवक दिन
३० जानेवारी - हुतात्मा दिन
२८ फेब्रुवारी - राष्ट्रीय विज्ञान दिन
८ मार्च - महिला दिन
७ एप्रिल - जागतिक आरोग्य दिन
१ मे - कामगार दिन
१५ मे - कुटुंब दिन
२१ मे - जागतिक वन दिन
५ जून - पर्यावरण दिन
१६ जून - जागतिक एकता दिन
११ जुलै - जागतिक लोकसंख्या दिन
६ ऑगस्ट - हिरोशिमा दिन
९ ऑगस्ट - क्रांती दिन
८ सप्टेंबर - साक्षरता दिन
१५ सप्टेंबर - आंतरराष्ट्रीय शांती दिन
१ डिसेंबर - विश्व एडस् दिन
३ डिसेंबर - भोपाळ दिवस
२३ डिसेंबर - कृषी / किसान दिवस

अशाच प्रकारे वैज्ञानिकांनी लावलेले शोध संशोधन यांची माहिती मनोरंजक रित्या दिली तर त्यांना विज्ञान हा विषय ही सोपा वाटेल. शाळांमध्ये काही गोष्टी ह्या सामुहिक प्रार्थनेनंतरही करता येण्यासारख्या आहेत तर काही ठराविक वर्गाकरताच आहेत.विज्ञानाची (वैज्ञनिकांची) माहिती मिळविण्यासाठी आपल्याला लोकविज्ञान नावाच्या दिनदर्शिकेचा उपयोग होऊ शकेल.

ही दिनदर्शिका मिळण्याचे ठिकाण :

'लोकविज्ञान',
४६, डॉ. आंबेडकर रस्ता,
संगम पुलाजवळ,
पुणे - ४११ ००१.



# सांस्कृतिक मेळावा

मेळाव्याचा उद्देश पूर्णपणे मुलांचे मनोरंजन करणे हाच आहे. त्यामुळे ह्यात अनेक गोष्टींचा समावेश करता येण्यासारखा आहे. १४ नोव्हेंबर हा दिवस आपण बालदिन म्हणून साजरा करतो. या दिवशी ह्या मेळाव्याचे आयोजन आपल्याला करता येण्यासारखे आहे. कालावधी आपल्याला जेवढा हवा तेवढा ठेवता येईल. ह्याचे नियोजन व आयोजन शिक्षक व विद्यार्थी दोघेही करणार असल्यामुळे किती दिवसांचा कार्यक्रम आखायचा हे ठरवता येण्यासारखे आहे. यामध्ये खूप वेगळ्या प्रकारचे खेळ घेता येतील.

**शर्यती**

उदा. - तीन पायांची शर्यत
- पोत्यातून पळणे
- संगीत खुर्ची
- चमचा गोटी / लिंबू
- पुस्तक डोक्यावर घेऊन चालणे
- हळू चालणे
- सुईत धागा ओवणे
- अडथळ्यांची शर्यत

ह्या कोणत्याही खेळांना बक्षिसं नसतील. फक्त विद्यार्थ्यांना आनंद मिळावा हा उद्देश.

**चित्रकला**

- चित्रकलेमध्ये विद्यार्थ्यांना एखादा विषय देऊन चित्र काढायला सांगणे. (वयोगटाप्रमाणे विषय असतील)
- विद्यार्थ्यांना विषय न देताही चित्र काढायला देणे. यामध्ये मुलांची चित्रे काढण्याची विविधता दिसून येते.
- सर्वांची चित्रे काढून झाल्यावर ती आपापल्या वर्गात लावायची व इतर विद्यार्थ्यांना ती पहायला बोलवायचे किंवा शाळेच्या आवारातही चित्रे लावावी.
- एखाद्या विद्यार्थ्यांची चित्रकला चांगली असेल तर त्याचा इतर कामातही उपयोग करुन घेता येईल.

**मातीकाम**

मातीत खेळायला मुलांना नेहमीच आवडते व ते वेगवेगळ्या वस्तू नेहमी बनवत असतात. म्हणून त्यांना ह्यादिवशी माती देऊन वेगवेगळ्या वस्तू बनवायला सांगणे. छोट्या

वयोगटातील मुलांना फळे व इतर सोप्या वस्तू बनवायला सांगणे. मुलांच्या बोटांच्या हालचाली व्यवस्थित होण्याकरिता मातीकाम खुपच महत्वाचे आहे.

**टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवणे**

- यामध्ये मुलांना थोडी कल्पना देऊन मग ह्या वस्तु तयार करायच्या.
- टाकाऊ असलेल्या वस्तू गोळा करुन आणून त्यांच्या वस्तु बनवायला सांगाव्यात.
- ह्या वस्तूंचे प्रदर्शन भरवावे.
- जादूचे प्रयोग दाखवावे.

**शेकोटी व सांस्कृतिक कार्यक्रम**

- विद्यार्थ्यांना आपल्याजवळील कला दाखविण्यासाठी ही एक छान संधी आहे.
- शेकोटी पेटवून त्याच्या भोवती गोल बसून गाणी, गप्पा, नाच करता येईल.
- यामध्ये शिक्षकांचाही सहभाग असायला हवा.
- एखादा बालचित्रपट दाखवावा.

बालचित्रपट उपलब्ध होऊ शकतील अशी ठिकाणे -

१) अभिव्यक्ति मीडिया फॉर डेव्हलपमेंट, नाशिक.

२) N'CYP, फिल्म डिव्हीजन, जी. देशमुख मार्ग, पेडर रोड, मुंबई - ४०० ०२६.



# आरोग्य जत्रा

आपल्या सर्वांच्या दृष्टीने आरोग्य ही महत्वाची बाब आहे. त्यामुळेच त्याचे महत्त्व मुलांपर्यंत पोहचावे असे वाटत असते. हे महत्व सांगण्यासाठी आपण जर वेगवेगळ्या पद्धती वापरल्या तर मुलांना त्या लवकर व चांगल्या प्रकारे समजतील. आरोग्य जत्रा भरवून आपल्याला जे काही सांगायचे आहे ते मुलांपर्यंत पोहचवता येईल.

यामध्ये आपल्याला काय काय करता येईल ----

१) **पोस्टर प्रदर्शन -**

यामध्ये मुलांना समजतील अशी वेगवेगळ्या विषयांवरची भित्तीपत्रके (पोस्टर) (स्वच्छता, हगवण, खोकला, डोळे येणे, खरुज यासारखे) वापरुन त्यावर हे प्रदर्शन भरविता येईल, ह्या विषयांवरच्या गोष्टी/कविता जर उपलब्ध होऊ शकल्या तर फारच चांगले. केवळ लिखाणापेक्षा कवितेच्या माध्यमातून मुलांना सांगितलं तर ते जास्त चांगलं समजेल, कविता चाली लावून म्हणताही येतील.

२) **प्रात्यक्षिकं**

काही गोष्टी प्रत्यक्षात करुन दाखविणे, यामध्ये हगवण लागल्यावर घरच्याघरी काय उपाय करु शकतो यासाठी 'जल संजीवनी' कशी तयार करतात याचे प्रात्यक्षिक दाखवावे. जेवणापूर्वी आपण कधीकधी हात धूत नाही. अशा वेळी आपले हात किती अस्वच्छ आहेत हे दाखविण्यासाठी काचेच्या भांड्यात पाणी घेवून त्यात मुलांना हात धुवायला लावणे. डोळे आल्यावर डोळ्यांची काळजी कशी घ्यावी, डोळे स्वच्छ कसे धुवावेत ह्याचे प्रात्यक्षिक करणे.

३) **गोष्टी सांगणे -**

आपल्याला माहीत असलेल्या आरोग्याच्या गोष्टी सांगणे, गाणी म्हणणे, यामध्ये चित्र कथेचा ही वापर करता येईल. मागे सांगितल्याप्रमाणे कल्पफलकावर ही गोष्ट तयार करता येईल. ओवीचाही वापर करता येण्यासारखा आहे.

४) **फिल्म दाखवणे -**

आरोग्यावर आधारित फिल्मही दाखविता येईल. यासाठी आपल्याकडे टी.व्ही., व्ही.सी.आर. ची उपलब्धता असणे आवश्यक आहे.

फिल्म्सची नावे -

रोग पुराण (मराठी) - विषय टी.बी.,

प्रिस्क्रिपशन फॉर हेल्थ (मराठी) - विषय सामाजिक आरोग्य,

कहाणी नहाणाची (मराठी) - विषय स्त्री आरोग्य शिक्षण, गुलाबोकी कहानी, तोता मैना की जुबानी (हिंदी) - विषय पंडूरोग (रक्तपांढरी)

हम सब कहे सबको कहे (हिंदी) - विषय लसीकरण

सॅनिटेशन स्पॉट (हिंदी) - विषय सामाजिक आरोग्य

(वरील फिल्म मिळण्याचे ठिकाण - अभिव्यक्ति मीडिया फॉर डेव्हलपमेंट, नाशिक.)

५) **खेळ -**

यामध्ये आरोग्यावर आधारित खेळही घेता येतील. उदा. जीवनसत्वाचा अभाव - होणारे आजार, कशापासुन काय मिळतं? अशाप्रकारे नवीन नवीन खेळांचा शोध तुम्हालाही लावता येईल.

६) **नाटुकले -**

आरोग्यातील एक विषय घेऊन त्यावर छोटं नाटुकलंही तयार करता येईल.

उदा. हगवण, थुंकु नये, खरुज येणे, उवा होणे, दात न घासणे.

विषयातील गांभीर्य मुलांना कळावं, त्यांच्या प्रश्नांना योग्य उत्तरे देता यावीत, यासाठी पुरेसा वेळ असणं आवश्यक आहे. एकावेळी एका वर्गाने घेऊन जर या कार्यक्रमात सहभाग घेतला तर सर्वांनाच ते फायदेशीर ठरेल.

यासाठी लागणारे मार्गदर्शन हे खालील ठिकाणाहून उपलब्ध होऊ शकेल.

१) अभिव्यक्ती मिडीया फॉर डेव्हलपमेंट, नाशिक.

२) जिल्हा परिषद - आरोग्य विभाग

३) एच्.एफ्.डब्लू.टी.सी. - आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र.

४) आरोग्य पत्रिका (मासिक)

५) प्राथमिक आरोग्य केंद्र

# गंमत जत्रा

जत्रा म्हटली की मुलांचा उत्साह पहावलाच नको. खूप मजा, खूप खेळणी, खूप खूप खाऊ. पण ही जत्रा थोडी आगळी वेगळी, प्रलोभनं नसणारी, गावातल्या जत्रेपेक्षा निराळी. नावाप्रमाणेच गंमतीशीर.

मुलांना अभ्यास करण्यास हुरुप यावा, त्यांची एकमेकांशी मैत्री व्हावी, मुलांना शिक्षकांची नी शिक्षकांना मुलांची चांगली ओळख व्हावी यादृष्टीने या गंमतजत्रेचे आपल्या शाळेत आयोजन करता येण्यासारखे आहे. यातील कुठल्याही खेळात स्पर्धा नाही. हरवणं/जिंकणं नाही तर फक्त मनसोक्त मजाच आहे. निखळ मनोरंजन करणे, यामध्ये आणखीही एक गोष्ट आहे ती म्हणजे मुलांना हसत हसत विज्ञान शिकवणे. यातील काही खेळ हे वैज्ञानिक तत्त्वावर आधारलेले असल्यामुळे खेळातूनही विज्ञान शिकता येते.

या जत्रेचा अनुभव मुलांसाठी व आमच्यासाठी खूपच वेगळा होता. मुलांशी ओळख करुन घेण्यासाठी ही जत्रा खूपच उपयोगाची ठरली. या जत्रेनंतर मुलांनी त्यांचे अनुभव लिहिले. खूपच मनापासुन लिहिले होते. 'आम्हाला सगळे खेळ आवडले. कारण या आधी असे खेळ आम्ही कधीच खेळलो नव्हतो. आम्हाला ते खेळ खेळतांना खूप मजा वाटत होती. आम्हाला ते खेळ खेळत असतांना आम्ही लहान आहे असे वाटत होते. कारण ते खूप सोपे होते व आनंदही वाटत होता.' ही इयत्ता आठवीतील एका विद्यार्थ्याची प्रतिक्रिया. अशाच प्रकारच्या प्रतिक्रिया इतर विद्यार्थ्यांकडूनही मिळाल्या होत्या. मुलांनी या जत्रेत खूपच धम्माल केली. त्यांना मिळालेला आनंद हेच ह्या जत्रेचे उद्दिष्ट होते.

१) पानं ओळखणं - टेबलावर वेगवेगळ्या वनस्पतींची पाने ठेवून मुलांना ती ओळखायला लावणे.

२) फुले ओळखणं - वेगवेगळ्या प्रकारची फुलं मांडून ती मुलांना ओळखायला देणे.

३) पदार्थ ओळखणं - डोळे बंद करुन फक्त वासावरुन पदार्थ ओळखायचा. विशेषकरुन वेगवेगळे मसाले व काही जुजबी औषधं.

४) लगोर रचणं - लगोर नेहमी हातानेच रचतो. पण

कधी कधी पायाने रचायलाही मजा येते. ही लगोर खुर्चीवर बसून रचायची.

५) उंची मोजणं - आपली उंची किती ? हे सर्वांनाच जाणून घ्यायला आवडते. भिंतीवर उंची मोजण्यासाठी खड्डूने पट्टी तयार करायची म्हणजे प्रत्येकजण येऊन आपली उंची मोजून घेईल.

६) नेम धरणं - जोकर किंवा सिंहाचा चेहरा तयार करुन त्यांच्या तोंडाच्या ठिकाणी भोक करुन त्यात नेम धरुन बॉल मारणे.

७) धान्य ओळख - छोटया कापडी पिशव्यामध्ये धान्ये भरुन त्या शिवून त्यातील धान्य मुलांना स्पर्शाने ओळखायला सांगणे.

८) मासे पकडणं - पुठ्याचे मासे बनवून त्याला टाचणी लावणे व गळ तयार करुन गळाला छोटे लोहचुंबक लावून त्याने मासे पकडणे.

९) नकाशा जोडणं - वेगवेगळ्या नकाशांचे तुकडे करुन ते मुलांना जोडायला द्यायचे.

१०) शब्दकोडी सोडवणं - सोपी शब्दकोडी चार्टपेपरवर तयार करुन मुलांनी ती सोडवायची. दुसऱ्या ठिकाणी उत्तराचा कागद लावायचा त्यावरुन मुलांनी आपली उत्तरं पडताळून पहायची.

११) रस्ता शोधणं - एका चार्टपेपरवर खूप रस्ते काढायचे वेडेवाकडे कसेही. 'अ' व्यक्तीला नेमक्या ठिकाणी पोहचायचे आहे. तर त्याला रस्ता शोधण्यास मदत करणे.

१२) फुगे फोडणं - आपण नेहमीच फुगा जपून फुगवतो पण यामध्ये फुगा फुटेपर्यंत फुगवायचा. मुलांना खूप मजा येते.

१३) बाटलीत खडू घालणं - यामध्ये काचेची / प्लॅस्टीकची बाटली व खडू घेणे. बाटली आडवी ठेऊन बाटलीच्या तोंडाशी खडू ठेवणे व तो फुंकर मारुन आत ढकलणे. पण तो आत न जाता बाहेर येतो कारण बाटलीतील हवा खडूला बाहेर ढकलते. मुलांना खेळल्यावर हे कारण शोधण्यास सांगावे.

१४) मेणबत्या पेटवणं - एका काडीत जास्तीत जास्त मेणबत्या पेटवणे.

१५) रांगोळी काढणं - रांगोळी आपण हाताने काढतो पण टांगत्या कोनाने रांगोळी काढण्यातही कौशल्य असते. अशी रांगोळी मुलंही काढतील.

१६) कबुतर काढणं - एका कागदावर हाताचा पंजा पसरुन

ठेवून पेन्सिलीने गिरवणं व त्यावर पंख चोच काढून कबूतर तयार करणं.

१७) ठसे उमटवणं - ठसे उमटतील अशा भाज्या गोळा करुन त्यांना रंगात बुडवून त्याचे वेगवेगळे ठसे उमटवणं.

१८) गोळी खाणं - पिठात गोळी ठेवून ती मुलांना हात न लावता खायला सांगणं. पीठ तोंडाला लागू नये म्हणून मुलं काळजी घेतात. नंतर आरसा दाखवावा. मुलांना खूप मजा येते.

१९) दोरीवरुन खेळणी वर सरकवणं.

२०) समतोल साधणं.


यामध्ये तुम्हालाही नव-नवीन खेळांचा अंतर्भाव करता येईल. फक्त त्यामध्ये स्पर्धा नसावी.

संदर्भासाठी पुस्तके -

- कबाड से जुगाड तक, खेल खेल में, अरविंद गुप्ता, एकलव्य ई१/२०८, अरेरा कॉलनी, भोपाल - ४६२ ०१६.
- शास्त्रीय प्रयोग - मनोरंजक जादू, मनोहर चंपानेरकर, जयदीप प्रकाशन, १०५, नारायण पेठ, आनंदश्री को-ऑप. हौ.सो., पुणे - ४११ ०३०.
- वैज्ञानिक खेळणी - डी.एस. इटोकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे.
- गंमत जत्रा - शोभा भागवत, गरवारे बालभवन, सारस बागेसमोर, पुणे.

मुलांसाठी मैदानी व बंदिस्त खेळ घेण्यासाठी संदर्भासाठी काही पुस्तके -

- मुलांसाठी खेळ - महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम, संशोधन मंडळ, पुणे - ४११ ००४.
- लहान जागेत महान खेळ - गो.ना. पुरंदरे, अनुभव प्रकाशन, श्रीधर, हनुमान रस्ता, विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७.
- खेळ आमुचे जमतीचे - श्रीधर राजगुरु, सुबोध प्रकाशन, माहेर १२०५ २/८, शिवाजी नगर, पुणे - ४११ ००४.


गंमत जत्रा

**आमची प्रकाशने -**

आम्ही पालक - वार्षिक

अभिव्यक्ती - त्रैमासिक

आम्ही पालक - मुखपत्र (मासिक)

सा रे ग म, सारे सम - पुस्तिका

आमची आशा - भित्तीपत्रक

खेळघर साथी - प्रशिक्षण पुस्तिका

सुसंवादाच्या पाऊलखुणा - पुस्तिका

प्रशिक्षण प्लॅनर

**आमची आगामी प्रकाशने -**

आकलन व आस्वादातून झेप

मैत्री शिबिर पुस्तिका

प्रशिक्षण मॅन्युअल

**चित्रफीत -**

गाण्यात गोष्ट जंगलाची

लढा

आम्ही पालक

बाळाची शाळा

सत्यचित्र - व्हिडिओ नियतकालिक

**ध्वनिफीत -**


गाणी जंगलाची

चल चल रंगे


सा रे ग म, सारे सम

**पपेट शो -**


सावित्रीचा मार्ग (हुंडा विषयक)



मी ऐकलं !
मी विसरलो !



मी पाहिलं !
माझ्या लक्षात राहिलं !



मी केलं !
मला कळलं !



मी स्वतः शोधलं आणि
उपयोगात आणलं !

तुमची मुलं ही तुमची मुलं नसतात
ती असतात जीवनाच्या स्वतःबद्दलच्या
आसक्तीची मुलं
ती तुमच्यातून जन्माला येतात पण
तुमच्यामुळे नव्हे
आणि जरी ती तुमच्याबरोबर असली
तरी ती तुमची नसतात
तुम्ही त्यांना तुमचं प्रेम द्या
पण तुमचे विचार देऊ नका
तुम्ही त्यांच्या देहाला निवारा देऊ शकता
पण त्यांच्या आत्म्याला नव्हे
कारण त्यांचे आत्मे वसतात 'उद्या' त
तिथे तुम्ही पोहोचू शकत नाही
तुमच्या स्वप्नातही नाही
तुम्ही त्यांच्यासारखे होण्याचा प्रयत्न
करू शकता पण त्यांना तुमच्या
सारखं बनवण्याची कोशिश करू नका
कारण जीवनाचा प्रवाह उलटा वहात नाही,
तो कधीच 'काल' पाशी घोटाळत नाही
तुम्ही आहात धनुष्य
ज्याच्या प्रत्यंचेवरून भविष्यात सोडले जाणार आहेत
सजीव बाण, तुमची मुलं.
त्या धनुर्धराच्या हातामध्ये तुम्हाला वाकायचंय्
त्यात तुम्हाला आनंद मिळू दे.

- खलील जिब्रान

(अनुवाद - छाया देव)